रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १०६
www.ramprahar.com
गुरुवार, २ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
शेकाप, मनसे कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश/३
अलिबागेत ३२ ठिकाणी बसवले जाणार सीसीटीव्ही कॅमेरे/५
भारतीय क्रिकेटपटू रियान परागने रचला इतिहास/८

## दहावी-बारावी बोर्ड परीक्षांच्या तारखा जाहीर



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. बारावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च २०२४ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १ ते २६ मार्च २०२४ या कालवधीत होणार आहे. इयत्ता दहावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा १० ते २९ फेब्रुवारी २०२४ आणि इयत्ता बारावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २ ते २० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर २ नोव्हेंबरपासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# मराठा आरक्षणासंदर्भात सर्वपक्षीय बैठक
## राज्यात शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्याचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सर्वांचे एकमत असून कायदेशीर बाबी पूर्ण करूनच टिकणारे आरक्षण देण्यासाठी राज्यातील सर्वच पक्ष एकत्रितपणे काम करायला तयार आहेत, मात्र राज्यात कुणीही कायदा हातात घेऊ नये, राज्यातील शांतता तथा कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, असे आवाहन बुधवारी (दि. १) सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत करण्यात आले तसेच या सर्व प्रयत्नांना उपोषणकर्ते मनोज जरांगे-पाटील यांनीही सहकार्य करावे व आपले उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन करणारा ठराव सर्वपक्षीय बैठकीत घेण्यात आला.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बैठकीच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, मंत्री सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, गिरीश महाजन, दादाजी भुसे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विविध पक्षांचे निमंत्रित सर्वश्री जयंत पाटील, नाना पटोले, सुनील तटकरे, अनिल परब, सुनिल प्रभू, आशिष शेलार, राजेश टोपे, सदाभाऊ खोत, जोगेंद्र कवाडे, सुलेखा कुंभारे, बच्चू कडू, राजू पाटील, कपिल पाटील, सदाभाऊ खोत, राजेंद्र गवई, डॉ. प्रशांत इंगळे, कुमार सुशील, बाळकृष्ण लेंगरे आदी उपस्थित होते. याशिवाय मुख्य सचिव मनोज सौनिक, महाधिवक्ता बिरेंद्र सराफ, सामाजिक न्याय सचिव सुमंत भांगे, इतर वरिष्ठ हजर उपस्थित होते.

### त्रुटी दूर करून टिकणारे आरक्षण देणार -मुख्यमंत्री
मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी ज्या कारणांमुळे आणि त्रुटींमुळे रद्द केले होते तसेच जी निरीक्षणे नोंदविली होती त्या त्रुटी आता नव्याने डाटा गोळा करताना होणार नाहीत याची संपूर्ण काळजी घेण्यात येणार आहे. या पावलांमुळे न्यायालयात टिकणारे असे आरक्षण मराठा समाजाला मिळू शकेल अशी खात्री आहे, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी व्यक्त केला.

**न्यायालयीन प्रक्रियेद्वारे मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठी सर्वतोपरी पावले उचलण्यात येतील तसेच राज्य मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून त्रुटी नसलेला परिपूर्ण डाटा विहित कालावधीत गोळा करण्यात येणार आहे.**
**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

या ठरावात पुढे असे म्हटले आहे की, मराठा आरक्षणाविषयी कायदेशीर कार्यवाही शक्य तितक्या लवकर करण्यात यावी, मात्र त्याला आवश्यक तो वेळ देणे गरजेचे आहे, हे आंदोलकांनीही समजून घ्यावे. राज्यामध्ये ज्या हिंसेच्या घटना घडल्या आहेत व घडत आहेत त्या अयोग्य असून आम्ही त्याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करतो. राज्यात कुणीही कायदा हातात घेऊ नये, राज्यातील शांतता तथा कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत मराठा आरक्षणविषयक घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. ते म्हणाले की, सरकार प्राधान्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याकडे लक्ष देत असून महाराष्ट्रात जाती-जातींमध्ये सलोख्याची संस्कृती टिकवणे महत्त्वाचे आहे. आपल्या सगळ्यांचा उद्देश मराठा समाजाला आरक्षण देण्याचा असून सर्व पक्ष संघटनांनी आपआपल्या भागात या विषयी आपल्या कार्यकर्त्यांना समजावून सांगितले पाहिजे. एकीकडे आपण सर्वोच्च न्यायालयात क्युरिएटेव्ह याचिकेद्वारे राज्य शासनाची भूमिका भक्कमपणे मांडत आहोत. त्यासाठी न्या. दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळ नियुक्त केले आहे. दुसरीकडे आपण मागासवर्ग आयोगाला नव्याने इम्पेरिकल डाटा गोळा करण्याचे निर्देशही दिले आहेत.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर तत्काळ या संदर्भातील शासन आदेश काढण्यात आला असून सर्व जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना कालच व्हिसीद्वारे कुणबी नोंदी असलेल्यांना तातडीने प्रमाणपत्रे देण्याचे निर्देश दिले आहेत. मोडी लिपीतील आणि उर्दू भाषेतील कागदपत्रांचे भाषांतर करून डिजीटाईझ करण्यासाठी व पब्लिक डोमेनवर आणून त्या आधारे कुणबी जात प्रमाणपत्र देण्याचे निर्देश दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले. (पान २ वर..)



# ग्रामपंचायत निवडणुकीसाठी भाजप महायुतीचा देवदमध्ये जोरदार प्रचार
## आमदार प्रशांत ठाकूर यांचा रॅलीत सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत देवद ग्रामपंचायत येथे भाजप महायुतीच्या उमेदवारांचा मंगळवारी (दि. ३१) प्रचार करण्यात आला. त्यास मतदारांचा प्रतिसाद लाभला.



(छाया : संकेत भोईर)

या निवडणुकीत भाजप महायुतीच्या वतीने थेट सरपंचपदासाठी विनोद वाघमारे; तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून चंद्र वाघमारे, कुंदा वाघमारे; प्रभाग २मधून विजय वाघमारे, साधना वाघमारे; प्रभाग ३मधून संदीप वाघमारे, दिनेश वाघमारे; प्रभाग ४मधून करुणा वाघमारे, संदीप वाघमारे उभे आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ मंगळवारी प्रचार रॅली काढण्यात आली होती.

या रॅलीत भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, जितेंद्र वाघमारे, वामनशेठ वाघमारे, निलेश वाघमारे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, दिनेश वाघमारे, विनोद वाघमारे, संदीप वाघमारे, सचिन वाघमारे, सुकापूर ग्रामपंचायतीचे सदस्य चेतन केणी, कैलास वाघमारे, राजू ठोकळ, शशिकांत वाघमारे, संजय वाघमारे, अरुण वाघमारे, मंगेश वाघमारे, विजय वाघमारे, भगवान भंडारी, वासुदेव वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते. मतदारांनी रॅलीचे स्वागत केले.

## निवडक

### जीएसटी संकलनामध्ये सणासुदीत मोठी वाढ
**नवी दिल्ली :** सरलेल्या ऑक्टोबर महिन्यात एकूण १.७२ लाख कोटी रुपये जीएसटी संकलन झाले आहे. १ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू झाल्यानंतर ऑक्टोबर २०२३मधील कर संकलनाची ही दुसरी सर्वोच्च पातळी आहे. दरम्यान, गेल्या वर्षी ऑक्टोबरच्या तुलनेत जीएसटी संकलनात यंदा १३ टक्के वाढ झाली आहे.

### आमदार अपात्रता याचिकेवर आज पुन्हा सुनावणी
**मुंबई :** शिवसेना आमदार अपात्रता याचिकेवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर गुरुवारी (दि. २) दुपारी १ वाजता सुनावणी होणार आहे. दोन्ही गटांकडून मिळून एकूण ३४ याचिका दाखल असून या याचिकांचे सहा गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

## अभीष्टचिंतन!



**पनवेल : भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील यांचे वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी अभीष्टचिंतन केले.**



# रायगडात दिवाळीआधीच आनंदाचा शिधा देण्याचे नियोजन
## चार लाख ३० हजार कुटुंबांना मिळणार लाभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिवाळीत सामान्य, गोरगरीब कुटुंबांना अवघ्या १०० रुपयांत आनंदाचा शिधा पुरवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. रायगड जिल्ह्यातील चार लाख ३० हजार कुटुंबांना ही भेट मिळणार असून दिवाळीपूर्वी सर्व जिन्नस देण्याचा पुरवठा विभागाचा प्रयत्न आहे.

सर्वसामान्य, गोरगरीबांचे सण हे आनंदात जावे यासाठी राज्य सरकारने मागील वर्षीपासून आनंदाचा शिधा वाटण्याचा निर्णय घेतला. सण-उत्सव काळात गोडधोड पदार्थ करण्यासाठी लागणारे जिन्नस अवघ्या १०० रुपयांत देण्याची ही योजना आहे. गणेशोत्सवात वाहतूकदारांचा संप होऊनही रायगडातील चार लाख २९ हजार ८५४ कुटुंबांना याचा लाभ मिळाला. (पान २ वर..)

**दिवाळीपूर्वी आनंदाचा शिधा लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न असेल. त्यासाठी सूक्ष्म नियोजन केले जात आहे. लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.**
**-विठ्ठल इनामदार, रायगड जिल्हा पुरवठा अधिकारी**

# रायगड जिल्ह्यात यंदा भाताची उत्पादकता वाढली

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात भातशेतीस अनुकूल वातावरण राहिल्यामुळे उत्पादकतेत वाढ झाली आहे. जिल्ह्यात प्रतिहेक्टरी ४० क्विंटल एवढी उत्पादकता आहे. गेल्या वर्षी प्रतिहेक्टरी ३६ क्विंटल एवढी उत्पादकता होती. यंदा एकूण ३६ लाख क्विंटल भाताचे उत्पादन होईल, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.



जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात ९८ हजार ३६ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन करण्यात आले होते. जून महिन्यात पाऊस उशिरा सुरू झाला. त्यामुळे शेतीच्या कामांनादेखील उशिरा सुरुवात झाली. जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे रोपे कुजली तसेच लावणीसाठी रोपे कमी पडली. त्यामुळे ८९ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावरच भात लागवड करण्यात आली. ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारली होती. त्यामुळे भात रोपे करपून नुकसान होण्याची भीती होती, परंतु सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस पडला. या पावसाने भातशेतीला नवसंजीवनी दिली.

उशिरा पडलेल्या पावसामुळे जेवढे नियोजन करण्यात आले होते त्यापेक्षा कमी क्षेत्रावर भाताची लागवड करण्यात आली. असे असले तरी उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाने प्रयत्न केले. अधिकाधिक उत्पन्न देणाऱ्या भाताच्या नव्या वाणांची लागवड करण्याचा सल्ला कृषी विभागाने शेतकऱ्यांना दिला होता. त्यानुसार भाताच्या नव्या वाणांची लागवड, २१ दिवसांच्या रोपांचा लागवडीसाठी वापर, लावणीसाठी यांत्रिकीकरण, एसआरटी व चारसूत्री पद्धतीचा अवलंब करण्यात आला. (पान २ वर..)

**परतीच्या पावसाचा दिलासा तसेच भातपिकावर रोगाचा प्रादुर्भाव न झाल्याने भात उत्पादकतेत वाढ झाली आहे. आता शेतकऱ्यांनी भाताची कापणी करून व्यवस्थित सुकवण्याची काळजी घ्यावी.**
**-उज्ज्वला बाणखेले, कृषी अधीक्षक, रायगड**

## वर्ल्डकपमध्ये आज भारत-श्रीलंका लढत

**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेत आतापर्यंत सर्वच्या सर्व म्हणजे सहा सामने जिंकून अजिंक्य असणारा भारतीय संघ आपला पुढील सामना गुरुवारी (दि. २) श्रीलंकेविरुद्ध खेळणार आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर हा सामना होईल.

वानखेडेची खेळपट्टी फलंदाजांसाठी अतिशय अनुकूल आहे. या खेळपट्टीवर फलंदाजांना खूप मदत मिळते. लहान सीमारेषेमुळे येथे मोठे फटके पहायला मिळतात तसेच या खेळपट्टीवर गोलंदाज नेहमीच संघर्ष करताना दिसतात, मात्र गोलंदाजांना सुरुवातीला स्विंगसह बाऊन्सही मिळतो. येथे नाणेफेक जिंकणारा संघ प्रथम फलंदाजी करण्यास प्राधान्य देतो.

भारत आणि श्रीलंका यांच्यात आतापर्यंत एकूण १६७ एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने झाले आहेत. त्यापैकी भारताने ९८ आणि श्रीलंकेने ५७ सामने जिंकले आहेत. विश्वचषकात मात्र दोन्ही संघांनी समान म्हणजे प्रत्येकी चार सामने जिंकलेत.

# पनवेलमधील पाले खुर्द, ढोंगऱ्याचा पाडा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन
## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पनवेल महापालिका हद्दीतील पाले खुर्द आणि ढोंगऱ्याच्या पाड्यात सुमारे तीन कोटी ९० लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. १) झाले. त्यामुळे तेथील नागरिकांना त्या त्या सुविधा मिळणार आहेत.

पनवेल महापालिका हद्दीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे मार्गी लागून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यानुसार भाजपच्या पाठपुराव्यामुळे पाले खुर्दमध्ये पावसाळी गटार आणि रस्त्यांचे डांबरीकरणाचे दोन कोटी ४५ लाख ३६ हजार १९४ रुपये खर्चून, तर ढोंगऱ्याच्या पाड्यात एमआयडीसी रोड कंपनी ते विठ्ठल मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि गटार बांधण्याचे विकासकाम एक कोटी ४७ लाख २९ हजार ४४७ रुपये खर्चून केले जाणार आहे.

या विकासकामांचा शुभारंभ भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी कामांचा दर्जा चांगला राखण्यासाठी ग्रामस्थांनीही याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन केले. (पान २ वर..)





(छाया : योगेश पाटील)

# जनतेशी सुसंवाद सामान्यांना न्याय देण्यासाठीच -मंत्री केसरकर

## जमीन मोजणीची मागणी अवघ्या १२ दिवसांत मान्य

**मुंबई : प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासूनची जमीन मोजणीची मागणी शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केवळ १२ दिवसांत मान्य केल्याने माटुंगा येथील साई विसावा एसआरए सहकारी हाऊसिंग सोसायटीच्या अध्यक्ष पद्मा नायडू यांनी पालकमंत्र्यांचे आभार मानले. मोजणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठीचे नगर भूमापन अधिकाऱ्यांचे पत्र पालकमंत्री केसरकर यांच्या हस्ते बुधवारी (दि. १) नायडू यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठीच 'जनतेशी सुसंवाद' आयोजित करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.



पालकमंत्री केसरकर दर बुधवारी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात जनतेशी सुसंवाद साधत आहेत. या कार्यक्रमावेळी आमदार सर्वश्री कालिदास कोळंबकर, कॅप्टन तमिळ सेल्वन, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अपर जिल्हाधिकारी रवी कटकधोंड, निवासी उपजिल्हाधिकारी जयराज कारभारी, जिल्हा नियोजन अधिकारी जी. बी. सुपेकर यांच्यासह संबंधित सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दर बुधवारी होणाऱ्या जनतेशी सुसंवाद कार्यक्रमामुळे नागरिकांची कामे जलदगतीने होऊ लागल्याची भावना येथे येणारा प्रत्येक नागरिक व्यक्त करू लागला आहे. साई विसावा संस्थेमार्फत १८ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या सुसंवाद कार्यक्रमात जमीन मोजणीच्या मागणीचे पत्र देण्यात आले होते. ते तत्काळ मान्य करण्यात येऊन बुधवारी त्यांना कागदपत्रांची पूर्तता करण्याचे पत्र देण्यात आले. याबद्दल सर्व रहिवाशांच्या वतीने नायडू यांनी आनंद व्यक्त करून पालकमंत्री केसरकर यांचे आभार मानले.

याचबरोबर संजय गांधी निराधार योजनेंतर्गत लाभाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आदी मागण्यांची तातडीने पूर्तता होऊ लागली आहे. पालकमंत्र्यांच्या हस्ते बुधवारी या प्रमाणपत्रांचेदेखील वितरण करण्यात आले. बुधवारी आलेल्या अर्जांमध्ये संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळावा, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र मिळावे, रहिवासी प्रमाणपत्र मिळावे आदी मागण्या करण्यात आल्या.

यापुढे प्रत्येक कामासाठीची कालमर्यादा निश्चित करून दाखले देण्याची कामे पूर्ण व्हावीत तसेच नागरिकांना तसे कळविण्यात यावे, असे निर्देश मंत्री केसरकर यांनी दिले. कुलाबा परिसरात नोटीस न देता घरे तोडल्याच्या एका तक्रारीच्या अनुषंगाने एसआरएच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून एका आठवड्यात अहवाल मागविण्याचे आदेश मंत्रीमहोदयांनी दिले.

# पनवेल महानगरपालिकेच्या थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या जप्तीपूर्व नोटीसा देण्यासाठी महापालिकेने पथकामध्ये वाढ केली आली असून आता एकूण १० पथकांच्या माध्यमातून देणार जप्तीपूर्ण नोटीसा देण्यात येणार आहेत. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार बुधवारी (दि. १)पासून महापालिका कार्यक्षेत्रातील थकबाकीदारांना महापालिकेच्यावतीने जप्तीपूर्व नोटीसा देण्यासाठी वाढीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



आत्तापर्यंत औद्योगिक १०० मालमत्तांना, निवासी ३०१ मालमत्तांना, वाणिज्य (कमर्शिअल) क्षेत्रातील ३४९ मालमत्ता अशा एकूण ७५० थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. या कामासाठी खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल अशा चारही नोडमध्ये दहा टिम करण्यात आल्या आहेत. येत्या काळात जप्ती पूर्व नोटीसा दिलेल्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर न भरल्यास त्यांच्या स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार आहे. जप्तीपूर्व नोटीसा देण्यासाठी महापालिकेच्यावतीने चार प्रभागातील जप्ती नोटिसा देण्यासाठी १० पथके तयार केली आहेत, तसेच मालमत्तांधारकांना एसएमएस पाठविण्यात आले आहेत.

या आर्थिक वर्षामध्ये महापालिकेचा मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांकडून उत्तम प्रतिसाद दिसून येत आहे. एप्रिल महिन्यापासून ते १ नोव्हेंबरपर्यंत २१० कोटींची भर महापालिकेच्या तिजोरीमध्ये झाली आहे. मालमत्ता कर भरण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होण्यासाठी पालिका कार्यक्षेत्रात जनजागृती केली जात आहे. ऑनलाईन मालमत्ता कर भरल्यास मालमत्तांधारकांना दोन टक्क्यांची सूट देण्यात येत आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी PMC TAX APP मोबाईल ॲप विकसित केले आहे, तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे.

अनेकवेळेला एका मोबाईल नंबरवर विविध मालमत्ता दिसतात. अशा वेळेला मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता क्रमांक तपासूनच मालमत्ता कर भरणा ऑनलाईन भरावा, तसेच मालमत्ताधारकाच्या मोबाईल नंबरवरती स्वत:च्या मालमत्तेसोबत अधिकच्या मालमत्ता दिसत असल्यास त्यांनी टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून किंवा व्हॉटस्ॲप क्रमांकावर आपल्या मालमत्तेची माहिती दिल्यास भरणा करतेवेळी येणाऱ्या समस्येचे निवारण पालिकेच्या वतीने करण्यात येत असल्याचे उपायुक्त गणेश शेटे यांनी सांगितले आहे.

# खालापुरातील वावर्ले ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविकास आघाडीची प्रचारातही आघाडी

**खालापूर : प्रतिनिधी**

५ नोव्हेंबर रोजी होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये वावर्ले ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविकास आघाडीचे उमेदवारांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत प्रचारात आघाडी पहायला मिळत आहे. आम्हाला एक संधी द्या, आम्ही राहिलेली अनेक विकासकामे मार्गी लावू, असे आश्वासन ग्रामविकास आघाडीकडून देण्यात येत आहे.



यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व आदिवासी बांधवांची आजपर्यंत न झालेली कामे आहेत ती आम्ही लवकर मार्गी लावू असेही बोलले जात आहेत. वावर्ले ग्रामपंचायतीमध्ये आमदार महेश बालदी यांच्या निधीतून अनेक विकासकामे मार्गी लागली असून काही कामे प्रगतीपथावर आहे. याचा फायदाही ग्रामविकास आघाडीला होऊ शकतो.

थेट सरपंचपदाचे उमेदवार अनिता पांडुरंग लबडे यांच्यासह सदस्यपदासाठी निवडणूक लढवत असलेले गजानन मुकणे, अजय पारठे, मेघा रमेश भद्रीके, मंदार शांताराम उतेकर, सुरेखा सिद्धार्थ रणदिवे यांचा विजय निश्चित होणार असे बोलले जात आहे. भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण पारठे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास आघाडी निवडणूक लढवत असून दामू खैर, पंकज लबडे, प्रदोष भद्रीके, दिलीप मांडे, शहाजी पाटील, श्रीराम पारठे, राजेश पारठे, मनोज पारठे, सचिन ठोंबरे आदी सहकारी कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.

# सायन-पनवेल महामार्गावर चालकांची टोल चुकवेगिरी

**पनवेल** : सायन-पनवेल महामार्गावर कामोठे टोल नाक्यावर टोल भरायला लागू नये, याकरिता तळोजा लिंक रोडमार्गे अवजड वाहने पनवेल-मुंब्रा महामार्गावर निघतात. त्यामुळे रोडपाली सिग्नल आणि कळंबोली सर्कलला मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी आहे.

पुणे-न्हावा-शेवा त्याचबरोबर गोवा बाजूला जाणारे वाहने टोल वाचवण्याकरीता कामोठे तसेच कळंबोलीला सायन-पनवेल महामार्गावरून जात नाहीत. तळोजा लिंक रोडने रोडपाली सिग्नल येथून पनवेल-मुंब्रा महामार्गावर कळंबोली सर्कलवर येतात. त्यानंतर पुणे आणि गोवा दिशेने जातात. राष्ट्रीय महामार्ग क्र.४वर गुजरात तसेच उत्तरेकडील राज्यातून वाहने शिळफाटा येथून येतात. कळंबोली स्टील मार्केट तसेच जेएनपीटीकडे अवजड वाहने जातात. त्यामुळे अगोदरच पनवेल-मुंब्रा महामार्गावर रहदारी असते. वाहनांची संख्या मोठी असल्याने वाहतूक अनेकदा मंदावते. त्यात टोल वाचवण्याकरीता अशा प्रकारचे वाहने येत असल्याने वाहनांमध्ये मोठी भर पडते. याबाबत कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# नवी मुंबई मनपा शहर अभियंता विभागात खांदेपालट

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयुक्त राजेश नार्वेकर यांनी महापालिकेत शहर अभियंता विभागात काही अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त जबाबदारी, तर काहींकडे तात्पुरता कार्यभार सोपवत खांदे पालट केला आहे. यामध्ये कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे यांच्याकडे सध्याच्या कामा व्यतिरिक्त संपूर्ण महापालिका कार्यक्षेत्रातील पाणीपुरवठा व्यवस्थापनाची जबाबदारी सोपवली आहे.

नेरूळ विभाग कार्यालयातील शाखा अभियंता सुधाकर मोरे यांच्याकडे कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. मोरे यांच्याकडे संपूर्ण महापालिका कार्यक्षेत्रातील मलनि:सारण व्यवस्थापनाचे काम सोपवण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागातील शाखा अभियंता किशोर अमरनानी यांना नेरूळ विभाग कार्यालयाचा उपअभियंता (स्थापत्य) पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांची मालमत्ता विभागाच्या उपायुक्तपदी बदली करण्यात आली आहे, तसेच उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्याकडे अतिक्रमण विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोवण्यात आला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सीए फाउंडेशनबाबत मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. १) महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेतर्फे सीए फाउंडेशनबाबत मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रासाठी प्रमुख व्यक्ते म्हणून महाविद्यालयातील माजी विद्यार्थी गुरुदत्त मोहन यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना सीए उत्तीर्ण होण्यासाठी लागणारी पूर्वतयारी व परीक्षेमधील बारकावे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षाच्या सुमारे ५० विद्यार्थ्यांनी या सत्राचा लाभ घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सीए परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी असणारी वेगवेगळी तंत्र, वेळेचे नियोजन तसेच अभ्यासामधील गती, संकल्पना स्पष्टता याविषयी मार्गदर्शन केले व सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्राचे आयोजन प्रा. अंकिता जागिड समन्वयक माजी विद्यार्थी संघटना यांनी केले तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. महेश धायगुडे, प्रा. रूपाली नागरेकर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# ग्रामपंचायत निवडणुकीत मनाई आदेशाचे उल्लंघन करू नये

## पनवेल पोलिसांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये शासनाने दिलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करू नये, असे आवाहन पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी घेतलेल्या बैठकीत केले.



ग्रामपंचायत निवडणुक अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील दापोली, ओवळे आणि गिरवले या ग्रामपंचायतींची निवडणूक ५ नोव्हेंबर रोजी प्रस्तावित असून त्या अनुषंगाने बुधवारी (दि. १) गिरवले ग्रामपंचायत उमेदवारांची ग्रामपंचायत कार्यालय येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत उपस्थितांना आदर्श आचारसंहिता पालन करण्याबाबत तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयाकडील मनाई आदेशाचे उल्लंघन न करण्याबाबत सूचित केले. सोशल मीडियाचे माध्यमातून कोणत्याही प्रकारे राजकीय, सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे बाबत सुचित करून उपस्थितांना उठ्ठउ १४९ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

या बैठकीसाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव यांच्यासह १५ उमेदवार व प्रतिष्ठित नागरिक हजर होते.

# राजपत्रित अधिकारी महासंघ कोकण भवन युनिटचा जीएसटी विभागाला पाठिंबा

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रीय पद्धतीप्रमाणे राज्यात वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागाची पुनर्रचना करावी यासाठी ३० ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या आंदोलनाला राजपत्रित अधिकारी महासंघ कोकण भवन युनिट यांनी पाठिंबा दर्शविला आहे. जीएसटी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि. १) गांधी टोपी परिधान करून आंदोलन केले.




वस्तू व सेवा कर जीएसटी कायद्याची अंमलबजावणी १ जुलै २०१७पासून देशभरात झाली. राज्य व केंद्र शासनाच्या तब्बल १४ करांचे विलनीकरण होऊन जीएसटी कायदा अस्तित्वात आला आहे. सध्या केंद्र व राज्य कर विभाग समान तत्वावर या कायद्याची अंमलबजावणी करीत आहेत. केंद्राने २०१७मध्येच विभागाची पुनर्रचना करून यंत्रणा सक्षम केली आहे, परंतु सहा वर्षांहून अधिक कालावधी होऊनदेखील अद्याप राज्य कर विभागाने पुनर्रचना केली नाही. ती करावी यासाठी या विभागातील अधिकारी आणि कर्मचारी एकत्र आले आहेत.

या आंदोलनात राजपत्रित अधिकारी महासंघ कोकणभवन युनिटचे अध्यक्ष डॉ. गणेश मुळे, सचिव डॉ. गणेश धुमाळ, तसेच गट अ आणि ब कर्मचारी संघटना गट क कर्मचारी संघटना सहभागी होत्या. सहसचिव कमलेश नागरे, उपाध्यक्ष निलेश जैन, सदस्य सुबोध लवटे, विकास कडाळे, अश्विनी चौधरी यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## मराठा आरक्षणासंदर्भात सर्वपक्षीय बैठक

महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयीन प्रक्रियेबाबत माहिती दिली. प्रारंभी सामाजिक न्याय विभागाचे सचिव भांगे यांनी न्या. संदीप शिंदे समितीने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली तसेच जिल्हाधिकारी व सर्व तहसीलदार यांना कुणबी नोंदी असलेल्यांना प्रमाणपत्र देण्याबाबत निर्देश देण्यात आल्याचे सांगितले.

बैठकीत विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार तसेच इतर उपस्थित पक्षांच्या प्रतिनिधींनी आपल्या सूचना मांडल्या.

## रायगडात दिवाळीआधीच आनंदाचा शिधा देण्याचे नियोजन

आता दिवाळीपूर्वीही गोरगरीब कुटुंबांना आनंदाचा शिधा पुरवला जाणार आहे. अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. साधारणपणे ही कुटुंबे चार लाख ३० हजारांच्या आसपास आहेत. त्यांना एक किलो साखर, एक लिटर पामतेल, तर पोहे, मैदा, रवा आणि चणाडाळ हे जिन्नस प्रत्येकी अर्धा किलो दिले जाणार आहेत. सर्व अवघ्या १०० रुपयांत मिळणार आहे. खुल्या बाजारात याची किंमत २५० ते ३०० रुपये इतकी आहे.

रायगड जिल्ह्यातील लाभार्थ्यांना हे जिन्नस दिवाळीपूर्वी मिळावेत असा पुरवठा विभागाचा प्रयत्न असणार आहे. त्यासाठी नियोजन केले जात आहे. दिवाळीपूर्वी म्हणजे १० नोव्हेंबरपर्यंत हा शिधा लाभार्थ्यांना मिळेल असा प्रयत्न असेल.

## रायगड जिल्ह्यात यंदा भाताची उत्पादकता वाढली

कर्जत, मुरुड, तळा या तालुक्यांमध्ये किरकोळ प्रमाणात भात शेतीवर खोडकिड्याचा प्रादुर्भाव झाला होता. पेण व पोलादपूर तालुक्यांमध्ये कडाकरपा रोगाचा प्रादुर्भाव झाला, परंतु मोठ्या प्रमाणावर कुठेही कीडरोगाचा प्रादुर्भाव झाला नाही. शिवाय परतीच्या पावसाने धोका दिला नाही. एकंदर भातशेतीस अनुकूल वातावरण होते. त्यामुळे कमी क्षेत्रात लागवड होऊनदेखील मागील वर्षापेक्षा यंदा भाताच्या उत्पादकतेत वाढ झाली आहे.

## पनवेलमधील पाले खुर्द, ढोंगऱ्याचा पाडा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

या विकासकामांच्या भूमिपूजनावेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, राम पाटील, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, प्रभाग क्रमांक २चे अध्यक्ष कृष्णाशेठ पाटील, गौरव भोईर, महेश पाटील, अशोक साळुंखे, श्रीनाथ पाटील, पवन भोईर, हरिशेठ फडके, ज्ञानेश्वर ढोंगरे, सागर भोईर, महेंद्र म्हात्रे, आकाश फडके, रोशन ढोंगरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत संकष्ट चतुर्थीला भाविकांची मांदियाळी

**पाली : प्रतिनिधी**

नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेला आलेल्या संकष्टी चतुर्थीला बुधवारी (दि. १) अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येत होते.



या वेळी येथील दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांचा धंदादेखील तेजीत होता. परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले होते. येथील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुले व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले होते.

मंदिर परिसरात वर्दळ होती. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# शेकाप, मनसे कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात सध्या ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या पार्श्वभूमिवर शेतकरी कामगार पक्षाला हादरे बसत असून अनेक तरुण भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. उरण मतदारसंघातील कर्नाळा ग्रामपंचायत हद्दीतील बारापाडा येथील शेकापच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. ३१) भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले.

या वेळी केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल तालुका भाजपचे उपाध्यक्ष विद्याधर जोशी, भाजपचे नेते फयाज दाखवे, कार्नाळा ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजू पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल पाटील, दिनेश पाटील, उमेश पाटील, कर्नाळा विभागाचे भाजप नेते बाळूशेठ पाटील, गणेश पाटील आदी उपस्थित होते.

बारापाडा येथील ज्ञानेश्वर गावंड, अमित गावंड, माधव म्हात्रे, नामदेव पाटील, मुरलीधर पाटील, नयन पाटील, अजय म्हात्रे, शाम पाटील, तुकाराम पाटील, जयराम पाटील, दिपक नांदगावकर, संदेश म्हात्रे, सुशांत नांदगावकर, सुनील नांदगावकर या तरुणांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाया वतीने होणाऱ्या विकास कामांवर प्रभावित होऊन अनेक पक्षाचे नेते भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश करीत आहेत. आदई गावातील मनसेचे राज पाटील, आश्विन सिंग, जय शंकर, रोहीत झगडे यांनी बुधवारी भाजपमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

या प्रवेशकर्त्यांचे भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

भाजपच्या शहर आणि तालुका मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य भुपेंद्र पाटील, माजी सरपंच महादू शेलके, जनार्दन पाटील, राजेश काकडे, जगदीश शेलके, निलेश पाटील, रोहित पाटील, ज्ञानेश्वर पाटील, जयेश पाटील यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



## तक्रार दिनानिमित्त पोलिसांनी जाणून घेतल्या तक्रारदारांच्या अडीअडचणी



**पनवेल : वार्ताहर**

तक्रार दिनाचे औचित्य सोडून पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तक्रारदारांच्या अडीअडचणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांनी जाणून घेऊन योग्य ते मार्गदर्शन केले.

या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील,पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार, पोलीस उपनिरीक्षक लाला लोणकर आणि गोपनीय अंमलदार राजेंद्र कुंवर आदींसह तक्रारदार उपस्थित होते.

या वेळी वपोनि. अनिल पाटील यांनी सांगितले की, सामंजस्याने आपल्या तक्रारींचे निवारण करता येईल त्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करून कायद्याचे पालन सर्वांनी करावे असे आवाहनसुद्धा त्यांनी केले.



**पनवेल : मराठा समाज नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा समाजाने एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले. या वेळी भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेतली. शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, सहाय्यक निरीक्षक संतोष शेट्ये हेही उपस्थित होते.**

## सीकेटी विद्यालयात सहाय्यक शिक्षिका उज्ज्वला मोहिते यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागामध्ये मंगळवारी (दि. ३१) उज्वला मोहिते यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, कार्यकारिणी सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर तसेच उज्वला मोहिते यांचे कुटुंबीय यांच्या उपस्थितीत सेवापूर्ती कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी मुख्याध्यापक कैलास सत्रे व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले.



मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. मुख्याध्यापक कैलास सत्रे यांनी उज्वला मोहिते यांच्या विद्यालयातील शैक्षणिक कार्याबद्दल माहिती दिली. उज्वला मोहिते यांनी २९ वर्ष ज्ञानदानाचे कार्य केले. मॅडमनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून रोटरी क्लब पनवेल यांच्याकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२२मध्ये आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारिणी सदस्या वर्षा ठाकूर यांच्या हस्ते मोहिते मॅडम यांचा सन्मान करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील माजी विद्यार्थी तुषार लांबोर यांनी मनोगत व्यक्त केले. वैष्णवी शिंदे, कौस्तुभ खुटले या विद्यार्थ्यांनी मॅडमबद्दलचे आपले विचार मांडले. तनुजा मोरे व सारिका दिवेकर यांनी मनोगतातून आठवणींना उजाळा दिला.

उज्वला मोहिते यांनी सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल संस्थेचे आभार मानले. या वेळी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राधिका शिर्के यांनी आभार प्रदर्शनाने केली.

## निवडक

### चिंचवण गावातील तरुण बेपत्ता



**पनवेल** : तालुक्यातील चिंचवण गावात राहणारा २२ वर्षीय तरुण कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेला आहे. तो हरवल्याची तक्रार त्याच्या नातेवाईकांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे. आशिष जोयाकीम उरव असे या तरुणाचे नाव असून त्याचा रंग सावळा, उंची पाच फूट तीन इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे व लांब वाढवलेले, डाव्या भुवईवर जुन्या जखमेचा व्रण असून त्याने काळा हाफ बाह्यांचा टिशर्ट व निळी जिन्स पॅन्ट घातली आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७५२३३३) किंवा पोलीस नाईक दीपक मोटे यांच्याशी संपर्क साधावा.

### गॅरेजमधून लाखोंच्या सामानाची चोरी

**पनवेल** : पळस्पे फाटा येथील एका गॅरेजमधून तीन अज्ञात चोरट्यांनी तीन लाख २४ हजार रुपयांच्या सामानाची चोरी केल्याची घटना घडली. या चोरीच्या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पळस्पे फाटाजवळील ओमेमा इंजिनीयर गॅरेजमध्ये तीन अनोळखी चोरट्यांनी गॅरेजचे वॉचमन कुंदन कोळी याला शिविगाळ करून गॅरेजचे पुढे असलेल्या शेडखाली ठेवलेले दोन लाख २४ हजार रुपये किमतीचे १४ डोजरचे रोलर, ८० हजार रुपये किमतीचे आठ कॅरर रोलर, आणि २० हजार रूपये किमतीचे भंगाराचे सामान चोरून नेले. या चोरीच्या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मोबाईल चोरीच्या घटनांत वाढ

**पनवेल** : दुचाकीवरून आलेल्या दोघांनी पादचाऱ्याचा मोबाईल हिसकावून धूम ठोकल्याची घटना खारघर येथे घडली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर ३५ ई मधील गणेश शेरवाई हे नेरूळ येथे काम करतात. ते सीआयएसएफ कॅम्पजवळील ओवेगाव, बसस्टॉप सेक्टर ३० येथे टॅक्सीची वाट पाहत उभे होते. या वेळी दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींपैकी एकाने त्यांच्या हातातील मोबाईल जबरीने हिसकावून ते टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या दिशेने निघून गेले.

### वीज चोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल** : विजेच्या मीटरमध्ये रिमोट कंट्रोल सर्किट बसवून एक लाख ६८ हजार ९५० रुपयांची वीजचोरी केल्याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर येथील स्टार प्लॅनेट दुकानाचे मीटर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तपासले असता वीजग्राहक हबीब उमरखान व बीज वापरकर्ते झहिंद एम हनीफ पटेल यांनी मोटरमध्ये रिमोट कंट्रोलचे सर्किट बसवून मीटरचे वाचन व्यवस्थितरीत्या होऊ न देता गेल्या ३३ महिन्यांपासून आठ हजार २५१ युनिटचे एकूण एक लाख ६८ हजार ९५० रुपयांच्या रकमेची वीज चोरी केली व वीज कंपनीचे नुकसान केल्याचे समोर आले.

## विशेष मुलांनी बनविल्या आकर्षक पणत्या





**उरण : वार्ताहर**

स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठानतर्फे चालवित असलेल्या सीबर्ड स्वीकार विशेष मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी आकर्षक पणत्या बनविल्या आहेत. या पणत्या २० ते १०० रुपये दोन नग दराने विकल्या जात आहेत. सुगंधी उटणे पाच ग्राम १५ रुपये पाकीट अशा दराने विकल्या जात आहेत.

शाळेतील विद्यार्थी दरवर्षी राख्या, पणत्या, तोरण, पाकीट, आहेर पाकीट, कागदी पिशव्या बनवित असतात. विशेष मुलांनी तयार केलेल्या वस्तूंना सेंटमेरी, ओएनजीसी, युईएस, द नर्चरिंग रूट, डीपी वर्ड कंपनी यांच्याकडून मागणी असते. या उपक्रमासाठी शाळेच्या सुपरवायझर माधुरी उपाध्ये, पल्लवी परदेशी, मानसी पांचाळ, राकेश म्हात्रे, प्रशांत कदम, गणेश जाधव, साक्षी दांडेकर, अस्मिता भोईर, गोपाळ म्हात्रे, सुहास ठाकूर, स्मिता वावरे आदी मेहनत घेत आहेत.

**कलागुणांना मिळतोय वाव**

**१ सप्टेंबर १९९९ रोजी बेलापूर येथील शिरीष पुजारी यांनी उरण येथे अवघ्या पाच मुलांपासून विशेष मुलांसाठी शाळा सुरू केली होती. आज या शाळेत ४० विद्यार्थी शिकत आहेत. शाळेत एकूण तीन वर्ग असून तीन शिक्षकतीन कर्मचारी आहेत. शाळेच्या पर्यवेक्षक माधुरी उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक वर्ग मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचा चांगल्या प्रकारे प्रयत्न करीत आहेत.**

## चिरनेर येथे भाजपचे प्रतिक गोंधळी यांना तरुणांचा वाढता पाठिंबा

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील प्रतिष्ठेची समजल्या जाणाऱ्या चिरनेर ग्रामपंचायतीची निवडणूक ५ नोव्हेंबरला होणार असून या निवडणुकीत राजकारणातील दोन मातब्बर घराणी आमने-सामने आली आहेत. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांविरोधात महाविकास आघाडीने उमेदवार उभे केले असून भारतीय जनता पक्षाचे थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रतिक गोंधळी आणि त्यांच्या सहकारी सदस्यपदाच्या उमेदवारांना प्रचारात वाढता पाठिंबा मिळत आहे.



भाजपने देशात नावीन्यपूर्ण योजना राबविल्या आहेत. या योजनांचा येथील नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी, मी नेहमीच प्रयत्नशील राहीन, तरुणांसाठी रोजगाराची निर्मिती तसेच सुशिक्षित तरुण वर्गाला गावाच्या विकासासाठी एकत्र आणून, योग्य नियोजन करून त्यांच्या माध्यमातून मला गावाच्या विकासाचे काम करायचे आहे. गरिबांच्या ज्या काही छोट्या मोठ्या गरजा आहेत. त्या गरजा पूर्णत्वास नेण्यास मी नेहमीच प्रयत्न करीन. गावातील तरुणांचा मोठा पाठिंबा आहे. त्यांच्याही काही अपेक्षा आहेत. त्या अपेक्षा पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

भाजपने विकासाची कामे केली आहेत. भविष्यात समाजकार्याला अग्रक्रम देऊन, गावाच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहून, ग्रामपंचायत निवडणुकीतील माझे सहकारी उमेदवार रमेश फोफेरकर, सुशील पाटील, समीर डुंगीकर,रमेश गोंधळी, अजिंक्य ठाकूर, अंकित म्हात्रे, सिताराम कातकरी, प्रणोती पाटील, सरिता खारपाटील, अश्विनी कातकरी, मेघा चिर्लेकर, अश्विनी नारंगीकर, वनश्री खारपाटील या सर्वांना सोबत घेऊन गावाच्या चांगल्या कामासाठी सहकार्य करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.









पनवेल : भाजप खारघर युवा मोर्चा अध्यक्षपदी नितेश अभिमन्यू पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नितेश पाटील यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर तसेच किरण पाटील, वासुदेव पाटील, समीर कदम, किर्ती नवघरे, दिलीप जाधव, साधना पवार, काशिनाथ घरत, अक्षय लोखंडे, केतन नवघरे, चंद्रकांत कदम, केतन थोरात, रमेश तपासे, रवी निकम, मयुर घरत, अतुल पाटील, मंगेश पाटील, अनिकेत पाटील, योगेश पाटील, जगन पाटील, मानव घरत, आदेश पाटील, आदित्य हाटगे, दीपक ठाकूर, बंटी ढाकसे, रोहित कोहरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

# पाळतीचा बागुलबुवा

अ‍ॅपल कंपनीकडून सरकारपुरस्कृत हॅकिंगचा इशारा मिळाल्याचे सांगत मंगळवारी विरोधी पक्षांच्या अनेक खासदारांनी घाईगडबडीने केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवून दिली खरी, परंतु भारतातील काही विरोधी पक्षनेत्यांना जो अलर्ट मोबाइलवर आला तशाच प्रकारचा अलर्ट १५० देशांमधील राजकीय नेत्यांना आल्याचे स्पष्ट झाल्याने विरोधी पक्षांचे आरोप बिनबुडाचे आणि हास्यास्पद ठरल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

**सरकारपुरस्कृत हॅकर्सनी ‘आयफोन’मधील माहिती चोरण्याचा प्रयत्न केल्याचा इशारा आपल्याला अ‍ॅपल कंपनीने दिल्याचा दावा मंगळवारी तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, शशी थरूर यांच्यासह विरोधी पक्षांच्या अनेक खासदारांनी केला. या खासदारांनी पुराव्यादाखल इशाऱ्याचा स्क्रीनशॉट ‘एक्स’ या समाजमाध्यमावर झळकवला. केंद्र सरकारने लगेचच हे आरोप फेटाळले असले तरी आरोपांची दखल घेत चौकशीचे आदेशही दिले. दरम्यान, सरकारपुरस्कृत हॅकर्सनी आयफोनमधील माहिती चोरण्याचा प्रयत्न केल्याच्या इशाऱ्याची जबाबदारी अ‍ॅपल कंपनीने स्वीकारलेली नाही. उलट ‘अ‍ॅपल’ने अशा प्रकारची सूचना १५० देशांत पाठवल्याच्या माहितीकडे केंद्रीय माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लक्ष वेधले. अशा प्रकारच्या इशाऱ्यांमागील कारणांची माहिती दिली जात नाही. धोक्याच्या काही सूचना चुकीच्या असू शकतात किंवा काही सायबर हल्ले ओळखलेही गेले नसतील असे कंपनीने खुलाशात म्हटले आहे. सरकारी पाठिंब्याने केले जाणारे सायबर हल्ले अत्यंत पद्धतशीर असतात आणि असे हल्ले कालपरत्वेच उघड होतात, असेही कंपनीने जाहीर केले आहे. सरकारने पाळत ठेवणे किंवा फोन टॅपिंग करणे अशा गोष्टी सर्वसाधारणपणे हुकुमशाही वा तत्सम अधिकारशाही पद्धतीच्या राजवटीत सर्रास चालतात. लोकशाही देशात मात्र अशा तऱ्हेने पाळत ठेवली तर त्या विरोधात विरोधक रान उठवतात. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात कथित फोन टॅपिंग प्रकरण गाजले होते. अशी पाळतीची प्रकरणे अन्य राज्यांतही यापूर्वी गाजली आहेत. कर्नाटकात १९८८ साली मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांना फोन टॅपिंगप्रकरणी सत्ता गमवावी लागली होती. अर्थात, कधीकधी सुरक्षा यंत्रणांना त्यांच्या कामाचा भाग म्हणून पाळत ठेवावी लागते. अमेरिकेतील पाळतीचे वॉटरगेट प्रकरणही ऐतिहासिक ठरले. एकूण काय हेरगिरी व पाळतीचे आरोप होणे व त्यावरून वाद उद्‌भवणे हे जगभरात सुरू असते. तसाच वाद आपल्याकडे निवडणुकांच्या तोंडावर उकरून काढण्याचा हास्यास्पद प्रयत्न विरोधकांनी केला असे आता म्हणावे लागेल. आयफोनची निर्मिती करणाऱ्या अ‍ॅपल कंपनीने या सर्व गोंधळावर त्वरित स्पष्टीकरण जाहीर केले. कंपनीने असा कोणताही अधिकृत अलर्ट दिलेला नाही. काही विरोधी पक्षनेत्यांच्या मोबाइलवर जो काही अलर्ट आला तो कोणत्याही विशिष्ट सरकारशी संबंधित नाही. आम्ही असे अलर्ट देत नाही, कारण उलट अलर्टमुळे हेरगिरी करणारे सावध होण्याची शक्यता असते. आरडाओरडा करणाऱ्या विरोधी पक्षनेत्यांना ज्या प्रकारचा अलर्ट मोबाइलवर आला तसा अलर्ट १५० देशांमधील राजकीय नेत्यांना आला आहे हेदेखील स्पष्ट झाले. साधारण दीड वर्षापूर्वी पेगॅसिस हेरगिरी प्रकरणावरून असेच आरोपांचे मोहोळ उठवण्यात आले होते. इस्रायली बनावटीचे पेगॅसिस हे सॉफ्टवेअर वापरून केंद्र सरकार विरोधकांवर हेरगिरी करीत असल्याचा आरोप तेव्हा करण्यात आला होता. परंतु त्या आरोपांतूनही काहीही ठोस पुढे आले नाही. आताही ‘अ‍ॅपल’च्या अलर्टचा वापर करून विरोधी पक्षांनी सरकारविरुद्ध मोहोळ उठवण्याची संधी साधली इतकेच म्हणावे लागेल.**

# पोलादपुरातील ग्रामपंचायत निवडणुकीचा रणसंग्राम

**खबरबात**
शैलेश पालकर

पोलादपूर तालुका मराठाबहुल समाजाची लोकवस्ती असलेला तालुका असून या तालुक्यामध्ये परजिल्ह्यातील ९६ कुळी मराठा, स्थानिक नायक मराठा आणि राव मराठा अशा तीन पोटजाती अस्तित्वात आहेत. याखेरिज तालुक्यात ब्राह्मण, चांद्रसेनिय कायस्थप्रभू, गुजराती व्यापारी असे सवर्ण समाज; तर इतर मागासवर्गीयांपैकी सोनार, वैश्यवाणी, शिंपी, कुंभार, कुणबी, सुतार, महादेवकोळी, खाटीक, परीट, चर्मकार, लोहार आणि भटक्या विमुक्त जाती–जमातीपैकी नवबौध्द, कातकरी, धनगर व बुरूड समाज अस्तित्वात आहेत. यापूर्वी गुजराती समाजाला इतर मागासवर्गीयांमध्ये गुर्जर लेवापटेल व रेवापटेल जातींपैकी असल्याच्या नामसाधर्म्यातून समावेश मिळाल्याने गुजराती भाषिक समाजाला निवडणूक लढण्याची संधी मिळाली. विविध शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षणही दिले.

आताही नगरपंचायत निवडणुकीमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग उमेदवारांचे आरक्षण अचानक रद्द करण्यात येऊन तिथे सर्वसाधारण प्रवर्गातून उमेदवार देण्यात आले. नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि अन्य आरक्षणाच्या उमेदवारांवर अन्याय करण्याची मानसिकता बहुसंख्याक असलेल्या सवर्ण समाजामध्ये आहे काय? इतपत शंका यावी अशी परिस्थिती दिसून आली तरी सर्व निर्णय न्यायालयीन प्रक्रियेनुसार होत असल्याने तसे ठामपणे म्हणण्यास वाव नसल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांचा मागास प्रवर्गाची लोकवस्ती असूनही त्यांना आरक्षण असल्यास लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी बहुसंख्याक सवर्ण समाजाकडून डावलली जात असल्याचे दिसून येत आहे. याखेरिज नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या तसेच अनुसूचित जाती अथवा जमातीच्या लोकांकडे जातीचे आणि जातपडताळणीचे दाखले नसल्यास उमेदवारी करण्यास कागदोपत्री अडथळे निर्माण होत असल्याचेही दिसून आले आहे. पोलादपूर शहरातील ग्रामपंचायत सदस्य नितीन बुटाला यांचे निधन झाल्यानंतर वर्षभराने सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली असल्याने तोपर्यंत वर्षभर ही जागा रिक्त ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

तालुक्यातील कुडपण बुद्रुक ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक आणि १० ग्रामपंचायतींच्या २२ रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून २३ नोव्हेंबरपासूनच संबंधित गांवांमध्ये आचारसंहिता जारी झाली आहे. या पोटनिवडणुकांमध्ये अनेक जागा आरक्षणानुसार उमेदवार न मिळाल्याने रिक्त राहण्याची शक्यता असल्याने आरक्षणाचा फेरविचार तातडीने करण्याची गरज निर्माण झाली आहे.

२०१२मध्ये पोलादपूर तालुक्यातील कुडपण बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सात जागांसाठी सार्वत्रिक निवडणुकीसह पांगळोली, महालगूर, गोवेले, कापडे बुद्रुक, पोलादपूर, तुर्भे खुर्द, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खोंडा, वझरवाडी, ओंबळी या ग्रामपंचायतीच्या आरक्षणामुळे रिक्त झालेल्या २२ जागांवर पोटनिवडणूक घेण्यात आली आणि सर्वच जागा रिक्त राहिल्या. २०१४मध्ये पोलादपूर तालुक्यातील तुर्भे बुद्रुक, तुर्भे खोंडा, तुर्भे खुर्द, कुडपण बुद्रुक, वझरवाडी, दिवील, पैठण, उमरठ, बोरघर, ओंबळी, पांगळोली, महालगूर, चरई, पळचिल, वाकण, गोवेले, कोतवाल खुर्द अशा एकूण १७ ग्रामपंचायतींच्या २८ प्रभागांमध्ये ३१ जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. यापैकी ओंबळी ग्रामपंचायतीमध्ये प्रभाग २मध्ये सर्वसाधारण जागेवरील ग्रामपंचायत सदस्य मयत झाल्याने या एका रिक्त जागेसाठी शशिकांत लक्ष्मण चिकणे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने ते बिनविरोध घोषित करण्यात आले, तर पांगळोलीतील प्रभाग २मध्ये दोन जागांपैकी अनुसूचित जाती स्त्री रिक्त जागेसाठी गंगूबाई दगडू कदम यांचा अर्ज आल्याने त्या बिनविरोध विजयी झाल्या.

२०१८मध्ये पोलादपूर तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या २७ रिक्त जागांसाठी पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला. यातील बहुसंख्य रिक्त जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती, अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला आरक्षणाची पदे रिक्त राहिली आहेत. त्या वर्षी राज्यात व देशामध्ये नव्याने विविध समाजांच्या आरक्षणाच्या मागणीने २०१७ साली असंख्य आंदोलने झाली असताना पोलादपूर तालुक्यात मात्र अनेक वर्षांपासून संबंधित ग्रामपंचायतीमध्ये जाहीर आरक्षणानुसार मतदार व लोकसंख्या उपलब्ध असूनही कागदोपत्री पूर्तता व सामाजिक अहमहमिकेमुळे ही पदे वर्षानुवर्षे रिक्त राहत असल्याचे पुन्हा उघडकीस आले आहे. या वर्षी पोलादपूर तालुक्यातील पैठणमध्ये अनुसूचित जमातीचे सरपंचपद रिक्त राहिले. मात्र याच अनुसूचित जमातीच्या व्यक्तीची सदस्यपदी निवड झाली होती. याचवर्षी नरवीर तानाजी मालुसरे यांचा शौर्यदिन व पुण्यतिथी सोहळा मोठ्या स्वरूपात सुरू असताना त्या ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श निवडणूक आचारसंहिता लोप पावलेली दिसून आली.

जात पडताळणीच्या जाचक अटीमुळे तालुक्यातील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम संबंधित प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध असूनही अनेकदा सर्वच जागा रिक्त राहूनच बासनात गुंडाळावा लागत आहे. त्यामुळे राजस्व अभियानादरम्यान महसूल विभागाने प्रत्येक नागरिकाला आधार ओळखपत्राप्रमाणेच जातीचा दाखला आणि मागास भाग असल्याने जातपडताळणीची सरकारतर्फे व्यवस्था करून दिल्यास या रिक्त जागांच्या निवडणूक व पोटनिवडणूक प्रक्रियेचा कार्यक्रम यशस्वी पार पडू शकेल, अशी भावना सर्वसाधारणेतर प्रवर्गातील राजकीय कार्यकर्त्यांमध्ये दिसून येते.

पोलादपूर तालुक्यामध्ये गेल्या काही वर्षांपासून सरपंचपदावर संघटनेच्या आणि गावकीच्या निर्णयानुसार सर्वत्र संगीतखुर्चीचा खेळ सुरू झालेला दिसून येत असताना यंदा ग्रामपंचायत काटेतळी येथील थेट बिनविरोध महिला सरपंचांसह आठ सदस्य असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंच आरती अजय मोरे यांनी २७ जानेवारी २०२० रोजी राजिनामा दिल्यानंतर तसा अहवाल २४ फेब्रुवारी २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आला. बहुचर्चित सरपंचांसह १० सदस्यीय लोहारे ग्रामपंचायतीचे सरपंच किसन दगडू पारकर यांनी २ मार्च २०२० रोजी दिलेल्या राजिनाम्याबाबत ८ मे २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल देण्यात आला. उमरठ येथील सरपंचांसह आठ सदस्यीय ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ गोपाळ कळंबे यांनी २४ जून २०२० रोजी राजिनामा दिल्यानंतर १३ ऑगस्ट २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल देण्यात आला, तर सरपंचांसह आठ सदस्यीय ओंबळी ग्रामपंचायतीमध्ये शशिकांत सहदेव चिकणे यांनी १४ जुलै २०२० रोजी राजिनामा दिल्याचा अहवाल ११ ऑगस्ट २०२० रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आला. १५ ऑक्टोबर २०२० रोजी काटेतळी, उमरठ आणि ओंबळी ग्रामपंचायतीमध्ये सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच पदासाठी अर्ज स्वीकारण्यात आले. यावेळी लोहारे ग्रामपंचायतीच्या सरपंचांची निवड करण्याचे टाळण्यात आले. कालांतराने लोहारे सरपंचपदी सदस्यांपैकीच एकाची निवड करण्यात आली होती, मात्र या थेट सरपंचपदांवरील व्यक्तीने राजिनामा दिल्यानंतर उर्वरित सदस्यांमधून उर्वरित सदस्यांनाच त्यांच्यापैकी सदस्याची सरपंचपदी निवड करण्याची संधी नवीन निर्णयाद्वारे देण्यात आल्यामुळे थेट सरपंचांनी सरपंचपदाचा राजिनामा दिल्यानंतर त्यांना सदस्यही न राहता थेट घरचा रस्ता दाखविण्यात आल्याचे दिसून आले आहे.

परिणामी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये सर्वाधिक मते अथवा बिनविरोध निवडून आलेले सरपंच गेल्या निर्णयानुसार सर्वाधिक अधिकारप्राप्त व्यक्ती असताना नवीन निर्णयामुळे ग्रामपंचायतीमध्ये सदस्यदेखील राहिले नाहीत. अलिकडेच पोलादपूर तालुक्यातील उमरठ, पैठण आणि परसुले येथील ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीसाठी एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही, तर उमरठ येथील पोटनिवडणुकीमध्ये सरपंचपदही अर्जाविना रिक्त राहिले आहे.




## हवा तेव्हा स्मार्टफोन, हवं तेव्हा घड्याळ!



चायनीज स्मार्टफोन निर्माता कंपनी Motorola नेहमी आपल्या नावीन्यतेसाठी ओळखली जाते. मोटोरोलाने आपल्या युजर्ससाठी एक नवीन डिव्हाइस सादर करण्याची तयारी करीत आहे. अलीकडेच असे समोर आले आहे की मोटोरोला एक नवीन बँड फोन लॉन्च करणार आहे, जो तुम्हाला स्मार्टफोनसारखा वापरता येईल. त्यासोबतच तुमच्या मनगटाभोवतीही गुंडाळता येईल. मोटोरोलाने त्याच्या Lenovo Tech World इव्हेंटमध्ये नवीन स्मार्टफोनचा प्रोटोटाइप लाँच केला आहे. हा नवीन बँड फोन शोकेस पीस आहे करतो. या प्रोटोटाइपने या आगामी उपकरणाचा डिस्प्ले लवचिक असल्याचे दाखवले आहे. हे उपकरण इतके लवचिक आहे की तुम्ही ते तुमच्या मनगटावर ते बँडप्रमाणे घालू शकता. मात्र, हे डिव्हाईस कधी लॉन्च होणार याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही.

२०१६मध्ये पहिल्यांदा ही संकल्पना : कंपनीने सर्वप्रथम हा २०१६मध्ये असा प्रकार सादर केला होता, ज्याला wrist phone म्हणतात. त्यानंतर कंपनीने या उपकरणाबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही, पण आता तब्बल सात वर्षांनंतर त्यांनी पुन्हा या उपकरणाबद्दल बोलण्यास सुरुवात केली आहे.

बँड फोनची विशेष वैशिष्ट्ये : या फोनच्या डिस्प्लेबाबत काही माहिती समोर आली आहे. असे दिसून येते की जेव्हा तुम्ही हे डिव्हाइस सरळ धरून ठेवता तेव्हा त्याचा डिस्प्ले ६.९ इंच असतो. जर तुम्ही ते फोल्ड केले तर त्याचा आकार ४.९ इंच एवढा होतो. डिझाईनबद्दल बोलायचे झाले तर तुम्हाला फोनच्या मागील बाजूस एक कापडासारखा प्रकार असतो. ज्यामुळे तो सहज बँड म्हणून वापरता येतो. कंपनी यातून तंत्रज्ञानाची व्याप्ती आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचे ओळख करून देणार आहे. कंपनीचा नवीन फोन फोल्ड करण्यायोग्य आणि रोल करण्यायोग्य असून तशा परिस्थितीतही चांगले काम करून शकेल. त्याच्या मदतीने कंपनी आपल्या ग्राहकांना अधिक चांगला अनुभव देऊ शकेल. आता कंपनी हा फोन कधी बाजारात आणते याकडे साऱ्यांचे लक्ष आहे.

# श्रेष्ठ संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर



**निमित्त**

अण्णासाहेब किर्लोस्कर यांचा जन्म ३१ मार्च १८४३ रोजी झाला, तर मृत्यू २ नोव्हेंबर १८८५चा. मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार म्हणून ओळखले जातात. त्यांचा संपूर्ण नाव बळवंत पांडुरंग किर्लोस्कर. जन्म धारवाड जिल्ह्यात गुर्लहोसूर या गावचा. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत कानडी व मराठी भाषेचा अभ्यास त्यांनी घरीच केला. नंतर कोल्हापूर व धारवाड येथे शिक्षणासाठी राहून मुलकी परीक्षेपर्यंत ते शिकले. त्या पुढील शिक्षणासाठी पुण्यास असताना त्यांना नाटकाची गोडी लागली व ते नाटक मंडळ्यांस पदे रचून देऊ लागले. स्वतःची नाटक मंडळी काढून त्यांनी काही नाटकेही केली. तथापि, ही नाटक मंडळी मोडली आणि ते गुर्लहोसूर येथे येऊन राहिले.

यानंतर किर्लोस्कर यांनी वकिलीची परीक्षा देण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी न झाल्यामुळे ते नोकरी करू लागले. शिक्षक, जमादार आणि महसूल आयुक्तांच्या कचेरीतील कर्मचारी अशा विविध प्रकारच्या नोकऱ्या त्यांनी केल्या. अण्णासाहेबांनी प्रारंभी अल्लाउद्दिनाची चितुडगडावरील स्वारी हे नाटक लिहावयास घेतले होते, पण ते अपुरेच राहिले. शिक्षक असताना शांकरदिग्जय हे गद्य नाटक त्यांनी लिहिले (१८७३). पुणे येथे १८८० साली एका पारशी नाटक मंडळीचे ऑपेराच्या धर्तीवरील एक नाटक त्यांच्या पाहण्यात आले. तसे नाटक मराठीत करून दाखविण्याची इच्छा त्यांस होऊन त्यांनी कालिदासाच्या अभिज्ञानशाकुंतल या नाटकाचे भाषांतर केले. त्यामध्ये स्वतःची पदेही घातली आणि उत्तम नटसंच मिळवून ते रंगभूमीवर आणले (१८८०). या नाटकास लाभलेले अपूर्व यश आणि लोकप्रियता पाहून १८८०मध्ये ‘किर्लोस्कर नाटक मंडळी’ची त्यांनी स्थापना केली. त्यानंतर सुभद्राहरणावरील संगीत सौभद्र हे नाटक स्वतंत्रपणे त्यांनी लिहिले (१८८२). प्रणयभावनेचे मनोहर चित्रण त्यांनी नाटकात केले आहे. सुसंघटिक कथानक, अकृत्रिम संवाद, विलोभनीय व्यक्तिरेखा, प्रासादिक पदे आणि नाट्योपरोधावर आधारलेल्या विनोदाचा अखंडपणे वाहणारा अंतःप्रवाह या वैशिष्ट्यांमुळे या नाटकाचे आकर्षण मराठी प्रेक्षकांच्या मनात आजही टिकून आहे.

रामराज्यवियोग (दुसरी आवृत्ती १८८८) या त्यांच्या अखेरच्या नाटकाचे तीन अंक लिहिल्यानंतर ते मधुमेहाच्या विकाराने गुर्लहोसूर येथेच निवर्तले. अण्णासाहेब स्वतः चांगले नट व दिग्दर्शक होते. महाराष्ट्रात संगीत नाटकांचे नवे युग त्यांनी निर्माण केले. इतकेच नव्हे, तर उत्तम संगीत नाटके कशी असावीत याचा आदर्श घालून दिला.

जुन्या विष्णुदासी नाटकांतील सूत्रधार, विदूषक, गणपती व सरस्वती यांच्या अनुक्रमाने होणाऱ्या प्रवेशाची परंपरा सोडून देऊन संस्कृत नाटकातील सूत्रधार, परिपार्श्वक व नटी यांच्या संवादांनी नाटकांची प्रस्तावना करण्याची त्यांनी प्रथा पाडली. नाटक मंडळ्या व नट यांच्याविषयी समाजात असलेली अनुदारपणाची भावना त्यांनी रसिकांना उदात्त करमणुकीचे नवे माध्यम उपलब्ध करून दिले. परिणामी समाजातील उच्च वर्गात मोडणारे लोकही त्यांच्या नाटक मंडळीशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवू लागले.

अण्णासाहेबांनी काव्यरचनाही बरीच केली आहे. पौराणिक नाटक मंडळ्या व कीर्तनकार यांना त्यांनी आख्याने रचून दिली. त्यांना कानडी, उत्तर हिंदुस्थानी आणि मराठी (लावणी इ.) गाण्यांच्या अनेक चाली अवगत होत्या व ते शीघ्रपणे कवने रचू शकत असत. त्यांनी ‘दक्षिणा प्राइझ कमिटी’ने बक्षीस लावल्यावरून स्पर्धेसाठी शिवाजी महाराजांवर पाचशे आर्यांचे एक दीर्घकाव्य रचिले होते.

महाराष्ट्रात १९४३ मध्ये साजरी झालेली त्यांची जन्मशताब्दी व त्यांच्या निधनानंतर ‘किर्लोस्कर नाटक मंडळी’ने पुणे येथे बांधलेले ‘किर्लोस्कर नाटकगृह’ या दोन घटना त्यांच्या सहकाऱ्यांचे व मराठी रसिकांचे त्यांच्यावर केवढे प्रेम होते याची साक्ष देतात. त्यांच्या सर्व लेखनाचा संग्रह समग्र किर्लोस्कर या नावाने प्रसिद्ध करण्यात आला आहे.

(साभार : विश्वकोष मराठी)

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : तालुक्यातील वावंजे गावामधील बहरलेल्या भातशेतीचे छायाचित्र. (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

### शरीरात यूरिक ॲसिड वाढल्यावर होतात समस्या

आजकाल यूरिक ॲसिडची समस्या फारच कॉमन झाली आहे. ज्यामुळे जुने आजार पुन्हा डोकं वर काढतात. खराब लाइफस्टाईल, चुकीचं खाणं–पिणं, पाणी कमी पिणं आणि कॅलरी जास्त असलेल्या पदार्थांचं सेवन यामुळे शरीरात यूरिक ॲसिडचं प्रमाण वाढतं. यूरिक ॲसिड शरीरात जमा होतं. रक्तात जर यूरिक ॲसिडचं प्रमाण वाढलं तर याने सांधेदुखी, किडनीची समस्या, हार्ट अटॅक अशा गंभीर समस्या होऊ शकतात. अनेकदा असंही होतं की, यूरिका ॲसिड क्रिस्टलचं रूप घेतात आणि जॉइंटजवळ जमा होतात. ज्यामुळे जॉइंटमध्ये वेदना होऊ लागतात.



**यूरिक ॲसिड वाढण्याची कारणं...**

रात्री जास्त खाणं, खराब लाइफस्टाईल, पाणी कमी पिणे, वेळेवर न जेवणे आणि न झोपणे, जास्त नॉनव्हेज खाणं, स्ट्रेस

**यूरिक ॲसिड वाढल्याने होणाऱ्या समस्या**

गाउट : हे संधिवाताचं एक रूप आहे. या स्थितीत शरीरात जॉइंटमध्ये वेदना होऊ लागतात. कारण यूरिक ॲसिड जॉइंट आणि टिश्यूजमध्ये तयार होतं. ज्यामुळे सूज आणि वेदना होतात. गाउट सामान्यपणे पायाच्या अंगठ्याचे जॉइंट, टाचा आणि गुडघ्यांना प्रभावित करतं.

किडनीची समस्या : किडनी यूरिक ॲसिड सोबतच रक्तातील अनेक विषारी पदार्थ फिल्टर करतात. यूरिक ॲसिड किडनीला नुकसान पोहोचवतं. यामुळे रक्तात जास्त यूरिक ॲसिड जमा होऊ लागतं.

**कशाचं सेवन करू नये?**

गोल्डन मनुके : मनुके द्राक्षांपासून तयार होतात. ज्यात प्यूरीन असतं. प्यूरीनच्या सेवनाने गाउट (आर्थारायटीस) ची समस्या आणखी वाढू शकते आणि याने रक्तात यूरिक ॲसिडचं प्रमाण वाढतं. गाउटच्या रूग्णांची ड्राय फ्रुट टाळले पाहिजे.

चिंचेचं पाणी : चिंचेच्या रसाचे अनेक फायदे आहेत. पण गाउटने पीडित लोकांनी याचं सेवन करू नये. फ्रक्टोजचं जास्त सेवन केल्याने यूरिक ॲसिडचं प्रमाण वाढतं. ज्याचे परिणाम चांगले होणार नाहीत.

सफरचंद : सफरचंदामध्येही फ्रक्टोज भरपूर असतं. अशात गाउटच्या स्थितीत सफरचंद अधिक खाणं घातक ठरू शकतं.

खजूर : खजूरामध्ये कमी प्यूरीन असतं. पण यात फ्रक्टोजचं प्रमाण जास्त असतं. अशात खजूर जास्त खाणंही घातक आहे कारण याने रक्तात फ्रक्टोजचं प्रमाण वाढतं.

# माणगाव तालुक्यात शेतकऱ्यांची भातकापणीसाठी लगबग सुरू

## खरीप हंगामात १२,५०० हेक्टर क्षेत्रावर पिकाची लागवड

**माणगाव : प्रतिनिधी**

जुलै महिन्याच्या अखेरीस लागवड केलेले भातपिक आता तयार झाले असून ते कापणीलायक झाले आहे. पावसाचा अंदाज घेत काही शेतकऱ्यांनी दसऱ्यात कापणी सुरू केली, तर काही शेतकऱ्यांनी दसऱ्यानंतर भात कापणीला सुरुवात केली आहे.



ही भातकापणी ३० टक्के झाली असून उर्वरित ७० टक्के भातपिक शेतात उभे असून त्याची कापणी माणगाव तालुक्यात होणे बाकी आहे. या भात कापणीतच माणगाव तालुक्यातील २६ ग्रामपंचायतीच्या निवडणुका लागल्यामुळे शेतकऱ्यांची एका बाजूला गाव कारभारी निवडण्याची तर दुसऱ्या बाजूला भातपिक कापून घरी आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली आहे.

यंदा भातलावणी उशिरा झाल्यामुळे भातकापणी ही तब्बल २० दिवस उशिरा सुरू झाली असून जुलै अखेरीस लागवड केलेले भातपिक कापणीसाठी तयार झाले आहे. या पिकांच्या काढणीसाठी मजूर दुर्मिळ झाले असून भातपीक शेतात काढणीसाठी तयार झाले आहे. जे मिळेल ते मजूर किंवा घरातीलच लहान थोर मंडळी भात कापणीच्या तयारीला लागला आहे तर काही शेतकरी मजूरच कामावर मिळत नसल्यामुळे पुरता चिंतेत सापडला आहे.

तालुक्यातील भातपिक पूर्ण तयार झाले असून ते कापणीलायक झाले आहे. माणगाव तालुक्यात यंदाचे वर्षी १२,५०० हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड खरीप हंगामात केली होती. या वेळी भाताचे सुधारित व संकरित भाताच्या सुप्रीम व सुपर सोना, कर्जत ३, कर्जत ४, कर्जत ५, कर्जत ७, जया, रत्न, सुवर्णा, रत्नागिरी, अजया ह्या जाती तर संकरित वाणात सह्याद्री ३, सह्याद्री ४, या जातीची पिकाची लागवड शेतकऱ्यांनी केली असून हे पिक पूर्ण कापणीसाठी तयार झाले आहे. या पिकाची कापणी ती ही वेळत व्हावी यासाठी शेतकरी हाताला मिळेल तो मजूर घेऊन कापणीसाठी सज्ज झाला आहे.

सध्या कमी मजुरांची संख्या होऊ लागल्याने त्यांचे समोर मोठा प्रश्न उभारला आहे. काही शेतकऱ्यांनी या मजूरावर अवलंबून न राहता आपल्याच घरातील भावकीची कांही मंडळी घेऊन भातकापणी सुरू केली आहे. आधुनिक यांत्रिकीकरणामुळे सुधारित पद्धतीने भातकापणी केल्यास शेतकऱ्यांची कमी वेळात, कमी खर्चात भातपिक कापणी होणार आहे.

# अलिबाग शहरात ३२ ठिकाणी बसवणार सीसीटीव्ही कॅमेरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षेसाठी अलिबाग शहरात लवकरच ३२ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. शहरातील हालचालीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे नजर राहणार आहे. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा नियोजन समितीमधून निधी मंजूर करण्यात आला आहे.

अलिबागमध्ये पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाढत्या नागरिकीकरणामुळे शहराचा विस्तार वाढत आहे. शहरामध्ये वेगवेगळ्या विभागाचे जिल्हा, तालुका कार्यालये आहेत. वेगवेगळ्या शिक्षण संस्था आहेत. याठिकाणी हजारोंच्या संख्येने कर्मचारी व विद्यार्थ्यांची वर्दळ असते. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी शासनाकडे निधीची मागणी केली होती.

जिल्हा नियोजन समितीकडे हा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे.

लवकरच शहरात ३२ ठिकाणी कॅमेरे बसविले जाणार आहेत. शहराच्या प्रवेशद्वारापासून सार्वजनिक ठिकाणी हे कॅमेरे लावण्यात येणार आहेत. यावर अलिबाग पोलीस ठाणे, वाहतूक शाखा, पोलीस नियंत्रण कक्ष यांचे नियंत्रण राहणार आहे. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्यासह माजी नगरसेवक अनिल चोपडा, नगर परिषद कर्मचाऱ्यांनी शहरात जेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवायचे आहेत त्या ठिकाणांची पाहणी केली.





**माणगाव : आली दिवाळी... उतेखोलवाडी जि.प. शाळेच्या इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांनी आकाशकंदील बनविल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी विशेष कौतुक केले.** (छाया : सलीम शेख)

# घरफोडीप्रकरणी वृद्ध महिलेचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना साकडे

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा मोहल्ला येथिल मुस्लिम समाजाची वृद्ध विधवा महिला पवित्र उमराह करण्यासाठी मक्का मदिना येथे गेल्या असता घरात कोणी नसल्याच्या संधीचा फायदा घेत घरफोडी करून घरातील मौल्यवान सामानाची चोरी करणाऱ्या चोरट्यांवर कारवाई करून आपल्याला न्याय द्यावा अशी मागणी या महिलेने रायगडचे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

बदरून्नीसा अली नाडकर या रोह्यातील वरचा मोहल्ला या ठिकाणी ५० वर्षे रहात आहेत. गेल्या सप्टेंबर महिन्यात त्या सौदी अरेबियातिल मक्का मदिना येथे उमराहसाठी गेल्या होत्या. या संधीचा फायदा घेत येथीलच तीन बंधूंनी घराचे कुलूप तोडून घरातील मौल्यवान चीजवस्तू, इतर सामान चोरून नेले, तसेच जे. सी. बी. लावून घर जमीनदोस्त केले.

याबाबत १९ सप्टेंबर रोजी महिलेच्या दोन सुनांनी पोलीस ठाण्यात तक्रार केलेली आहे. बदरून्नीसा नाडकर या सौदीहून भारतात आल्यावर त्यांना धक्काच बसला. त्या ३० सप्टेंबर रोजी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी स्वतः गेल्या. त्या वेळी त्यांना सांगण्यात आले आम्ही तपास करतो. तुम्ही घरात रहात असल्याचे पुरावे आणा.

बदरुन्नीसा यांनी ३ ऑक्टोबर रोजी गेल्या ४० वर्षातील लाईट बिले, नळपट्टी, घरातील सामानाचे फोटो आदी सर्व पुराव्यासह घरात काम करीत असल्याचे व्हिडीओ, कपाटातील सोन्याच्या दागिन्यांची यादी व घरातील इतर सामानाच्या यादी सहित तक्रार करण्यासाठी गेल्या असता त्यांच्या तक्रार अर्जावर रोहा पोलिसांनी पोच दिली नाही. पोलीस घरफोडीची तक्रार घेण्यास टाळाटाळ करून वृद्ध महिलेवर अन्याय करीत असल्याचे या महिलेने त्यांच्या तक्रारपत्रात म्हटले आहे.

आपण परदेशात असताना घरफोडी करणाऱ्या तिन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करावा व माझा चोरीस गेलेला सर्व सामान मला परत मिळावे अशी मागणी या वृद्ध महिलेने जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे.

# रेवदंडा ग्रामपंचायतीत विकासासाठी परिवर्तन घडवा —आमदार दळवी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात रेवदंडा प्रसिद्ध आहे, परंतु गेल्या ४० वर्षांत हवा तसा विकास झालेला नाही. रेवदंडा ग्रामपंचायतीत सर्वांगिण विकासासाठी परिवर्तन घडवा असे आवाहन आमदार महेंद दळवी यांनी निवडणूक प्रचारार्थ पारनाका येथे आयोजित प्रचारसभेत केले.

रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक ५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या निवडणुकीत शिवसेना, भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती आहे. या महायुतीच्या वतीने प्रफुल्ल मोरे हे थेट सरपंचपदासाठी निवडणूक लढवित आहेत. सदस्यासाठी प्रभाग क्रमांक १ मधून विजय हाडकर, वसूधा मेस्त्री,



ममताबेन पटेल, प्रभाग क्रमांक २मधून दुष्यंत झावरे, आशा कमळनाखवा, मंदा बळी, प्रभाग ३मध्ये रंजना उमेश उमटे, माधवी चौलकर, प्रभाग क्रमांक ४मध्ये दिक्षा बळी, सुराराम माळी, प्रभाग क्रमांक ५मध्ये केदार खोत, दिक्षा बळी, भारती मोरे, प्रभाग क्रमांक ६मध्ये प्रवीण बंगळेकर, योगेश पिटनाईक, मुमताज दिवेकर हे निवडणूक लढवित आहेत.

या निवडणुकीच्या प्रचारार्थ थेरोंडा आगलेची वाडी, डोऱ्याची वाडी, बाजारपाडा, खंडेराव पाडा, वरसोलपाडा ते रेवदंडा हायस्कुल, पारनाका, मोठा कोळीवाडा, मोठे बंदर अशी भव्य रॅली काढण्यात आली होती. या वेळी शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी, कामगार नेते दिपक रानवडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आशिष भट, शैलेश चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळाशेठ तेलंगे, शिवसेनेचे नारायण मुंबईकर, उमेदवार प्रफुल्लशेठ मोरे, प्रसाद गोंधळी आदी उपस्थित होते.

राम प्रहर

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

**उरण नगरपरिषद,**
**उरण, जि. रायगड**

**मुदतवाढ सूचना**

उरण नगरपरिषदेने उरण शहराच्या दुसऱ्या सुधारित विकास योजनेमधील आरक्षित जागेवरती सदर आरक्षणा संदर्भात फलक वसविणे कामी दि. ३०-१०-२०२३ रोजी सांय .४.०० वाजेपर्यंत कोटेशनमागविलेले होते. परंतु मुदतीत सदर कामी एकही कोटेशन प्राप्त झालेले नाही. सबब, सदर कामी याद्वारे दि. ०३-११-२०२३ पर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे.इच्छुक ठेकेदारांनी मुदतीत निविदा / कोटेशन सादर करावीत. सदर कामी यापूर्वी देलेल्या अटी/शर्ती जशाच्या तशा लागू राहतील.

**सही/-**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

# लोकप्रतिनिधींच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ

## खासदार सुनील तटकरेंच्या घराजवळ पोलीस बंदोबस्त वाढवला

**धाटाव : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे-पाटील यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाचे पडसाद राज्यभर उमटू लागले आहेत. लोकप्रतिनिधींच्या घरांची आणि वाहनांची जाळपोळ करून जमावाकडून आंदोलन करण्यात येत आहेत.



या पार्श्वभूमिवर तीन दिवसांपूर्वी ठाण्यात खासदार सुनील तटकरे यांना काळे झेंडे दाखवण्याचा प्रकार घडला आहे. म्हणून सुरक्षेतेच्या दृष्टीने खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे व त्यांच्या कुटूंबियांना पोलीस बंदोबस्त देण्यात आले आहे.

सुतारवाडी येथील खासदार सुनिल तटकरे यांच्या गीताबाग या निवास्थानी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना विशेष संरक्षण देण्यात आले आहे. त्यामध्ये आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार भरत गोगावले, आमदार रवी पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या निवासस्थानी दोन पोलीस अधिकारी व १० कर्मचारी असा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

# मुरूड आगाराने 'रातराणी' सुरू करावी; प्रवाशांची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड आगरमधून गाड्यांची संख्या कमी केल्याने प्रवासी वर्गाचे हाल होत आहेत. यासाठी गाड्यांची संख्या वाढवावी अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

मुरूड आगराकडून मुंबई सेंट्रल येथून रात्री १०.३० वाजता मुंबई-मुरूड ही गाडी गेल्या काही दशकापासून सुरू होती, परंतु ही गाडी अचानक बंद करून मध्यरात्रीनंतर १ वाजता मुंबई सेंट्रल येथून मुरूडसाठी फक्त एकच गाडी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे मुंबई येथून रात्री १०.३० वा.ची गाडी पुन्हा सुरू करण्यात यावी अशी मागणी प्रवासीवर्गाकडून होत आहे.

याबाबत मुरूड आगार व्यवस्थापक नीता जगताप यांनी सांगितले की, १५० चालक, वाहकांचे प्रशिक्षण सुरू आहे. यातील काही कर्मचारी वर्ग आगारास उपलब्ध होणार आहे. कर्मचारी उपलब्ध झाले की, सर्व गाड्या सुरू करणार आहोत. मुरुड आगारातून काही स्टाफ बदली झाल्याने कर्मचारी तुटवडा झाला आहे, परंतु लवकरच याची पूर्तता होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६ यांचे कार्यालय**

दूरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ | फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ | आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com | वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/आस्था/से.नि.अ/५१२३/प्र.क्र.३०/१२३५/२३ दिनांक :- ०१/११/२०२३

**थेट मुलाखत** (Walk in Interview )

पनवेल महानगरपालिकेमध्ये विवक्षित कामकाजाकरीता खालील नमुद केल्याप्रमाणे शासकीय/ निमशासकीय कार्यालय/सिडकोकडील, तसेच नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिकेच्या सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता, कंत्राटी तत्वावर / ठोक मानधनावर करार पद्धतीने खालील अटी व शर्ती नुसार सेवा प्राप्त करुन घेण्यासाठी दि. २०/११/२०२३ रोजी थेट मुलाखत (Walk in Intervie) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि.२०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे, सेवा निवृत्तीचे प्रमाणपत्र, अंतिम वेतन प्रमाणपत्र, ना विभागीय चौकशी, प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे घेऊन स्वत: हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| पदाचा संवर्ग | अनुभव | मानधन |
|---|---|---|
| सेवानिवृत्त लेखाधिकारी/ सहाय्यक लेखाधिकारी/ उपलेखापाल (पद संख्या ०२) | शासकीय/निमशासकीय/सिडको /नगर परिषद/न.पा/म.न.पा.मध्ये सेवेत असताना किमान ५ वर्षे लेखा विभागात काम केल्याचा अनुभव आणि ई.पी.एफ च्या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | म. शा. सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/13 दि. १७/१२/१६ आणि दि. ८/९/२०२३मध्ये विहित असलेले किंवा विशेष बाबींमध्ये मा. आयुक्त यांनी निश्चित केलेले मानधन. |

**अटी व शर्ती :-**

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
२) नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.
३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींस प्राप्त होणाऱ्या अधिकाराअंतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे/ माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
७) सदरची सेवा ही फक्त ३ वर्षांच्या मर्यादेकरिताच राहणार आहे. तथापी १ वर्षाच्या कालावधीत त्यांचे कामाचे मूल्यमापन करुन पुढे सदरची सेवा सुरु ठेवणे किंवा नाही, याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
८) यापूर्वी करण्यात आलेल्या सेवा कालावधीचा तपशील तसेच विभागीय चौकशी, फौजदारी गुन्हा याबाबतची माहिती सदरच्या मुलाखती वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
९) सदरच्या मुलाखती वेळी सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांसोबत स्व-घोषणापत्र भरुन देणे बंधनकारक राहील.
१०) पनवेल महानगरपालिकेस आवश्यक तितकेच अधिकारी/कर्मचारी घेण्यात येतील.

**सही/-**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**

# समाजमाध्यमांवर पोलिसांची करडी नजर; बैठकीत आवाहन

**रोहे : प्रतिनिधी**

समाजमाध्यमांवर आलेल्या पोस्टवर विश्वास ठेवू नये. काही अप्रिय घटना घडू नये यासाठी दक्षता नागरिकांनी घ्यावी. विशेषतः तरुणांनी दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. वादग्रस्त संदेश अथवा माहिती समाजमाध्यमांवर टाकू नये. त्यामुळे वातावरण तंग होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी काळजी घेण्याची



आवश्यकता असल्याचे तहसीलदार किशोर देशमुख व रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी रोहा पोलीस ठाण्यात मराठा समाज आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या सभेत सांगितले.

तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, नायब तहसीलदार राजेश थोरे, लालताप्रसाद कुशवाह, उस्मान रोहेकर, रवी चाळके, महेश कोलाटकर, महेश रोकडे, बिलाल मोर्बेकर, गोपनीय पोलिस पेडवी व शांतता समितीचे सदस्य उपस्थित होते.

या वेळी निरीक्षक प्रमोद बाबर यांनी, समाजमाध्यमावर पोलिसांची करडी नजर आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. समाजमाध्यमावर कोणी काही वादग्रस्त पोस्ट टाकल्यास पोलिसांना कळवावे, असे सांगितले.

यासह शहरासह ग्रामीण भागात तरुणांमध्ये जनजागृती करण्यात येईल असे सांगितले.

# मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत ८,४४४ लाभार्थ्यांचे लसीकरण

## नवी मुंबई मनपाची यशस्वी कामगिरी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शन सूचनांनुसार ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२३ या तीन महिन्यांत तीन फेऱ्यांमध्ये विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० ही मोहीम मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आली. या कालावधीत एकूण ६५०६ बालके व १९३८ गरोदर माता अशाप्रकारे एकूण ८,४४४ लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात आलेले आहे.



नवी मुंबई महापालिका आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० मोहीम कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांच्या नियंत्रणाखाली वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या मोहिमेंतर्गत ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२३ या तीन महिन्यात एकूण तीन फेऱ्या नमुंमपा कार्यक्षेत्रात यशस्वीरित्या राबविण्यात आलेल्या आहेत. या मोहिमेमध्ये पहिल्या फेरीत ७ ते १२ ऑगस्टदरम्यान २२९१ बालकांचे तसेच ६७३ गरोदर मातांचे, दुसऱ्या फेरीत ११ ते १६ सप्टेंबरदरम्यान २०८३ बालकांचे तसेच ६१५ गरोदर मातांचे आणि तिसऱ्या फेरीत ९ ते १४ ऑक्टोबर २०२३ कालावधीत २१३२ बालकांचे तसेच ६५० गरोदर मातांचे लसीकरण करण्यात आले.

प्रत्येक फेरीदरम्यान किंवा फेरीनंतर जागतिक आरोग्य संघटनेच्या पर्यवेक्षकांमार्फत लसीकरण सत्राच्या ठिकाणी भेटी देऊन फेर तपासणी करण्यात आली तसेच कार्यक्षेत्रातील पाच वर्षांपर्यंतच्या बालकांची फेर तपासणी करून लसीकरणाची स्थिती पडताळण्यात आली. यामध्ये एकही बालक वंचित आढळलेले नाही. मोहिमेतील उपक्रमाचा जास्तीत जास्त बालकांना व गरोदर मातांना लाभ मिळावा यासाठी अभियानांतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती नागरिकांना मिळण्याकरिता वस्तीवस्तीत मायकिंग तसेच बॅनर व होर्डिंगद्वारे जनजागृती करण्यात आली. आशा स्वयसेविकांमार्फत घरोघरी भेटी देऊन लाभार्थ्यांना लसीकरणाकरिता पाचारण करण्यात आले.

**आयुक्तांचे आवाहन**

नियमित लसीकरणांतर्गत बाळाला द्यावयाच्या सर्व लसी महापालिकेमार्फत मोफत देण्यात येत असून याकरिता पालकांनी महापालिकेचे नजिकचे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालय यांच्याशी संपर्क साधून बाळाला वेळीच लस देऊन सुरक्षित करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

# जासई उड्डाणपूल खुला झाल्याने प्रवास सुसाट!




**उरण : रामप्रहर वृत्त**

जासई उड्डाणपुलावरील एका मार्गिकेचे काम पूर्ण झाल्याने ती सुरू करण्यात आली आहे. गणेशोत्सवापूर्वी जेएनपीटी बंदर ते नवी मुंबई व पनवेलकडे जाणारी पुलावरील एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. त्यामुळे उरण ते नवी मुंबई व पनवेल या मार्गाने खासगी व सार्वजनिक वाहनाने प्रवास करणाऱ्या प्रवासी व वाहनचालकांचा प्रवास सुसाट झाला आहे.

जासई उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. त्यामुळे पूर्वी करळ उड्डाणपूल ते धुतुममार्गे गव्हाण फाटा या मार्गाने प्रवास करावा लागत होता. हे जवळपास दहा किलोमीटरचे अंतर कमी झाले असून करळ जासईमार्गे नंतर थेट गव्हाण फाटा काही मिनिटात कापता येत आहे.

# ट्रेलर-दुचाकी अपघातात तरुण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

ट्रेलरचा मागील टायर डाव्या हाताच्या पंजावरून गेल्याने २५ वर्षीय तरुण जखमी झाला. या प्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

भावेश कांबळे हा करंजाडे येथे राहतो. तो स्कुटीवरून टी पॉईंट ओलांडून कळंबोली सर्कलच्या दिशेने आला. या वेळी ट्रेलरचालकाने अचानक भावेशच्या दिशेने ट्रेलर वळवला. त्यामुळे भावेश स्कुटीवरून खाली पडला. त्या वेळी ट्रेलरचा मागील टायर त्याच्या डाव्या पंजावरून गेल्याने भावेश जखमी झाला, त्याला एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातात भावेशच्या पंजाचे व मनगटाचे हाड मोडले आहे.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाचा राज्यस्तरावर गौरव

**उरण : वार्ताहर**



लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटरचा पहिला टप्पा गौरव सोहळा व दुसरा टप्पा अनावरण कार्यक्रम शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ३१) मुंबई येथे झाला. या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयास उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात राज्यभरातून ६४००० शाळा रजिस्ट्रेशनमधून उत्कृष्ट कामगिरी केलेल्या १०० शाळा आमंत्रित होत्या. त्यापैकी अतिउत्कृष्ट अशा आठ शाळांचा गुणगौरव शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते करण्यात आला. त्यात श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे, सहाय्यक शिक्षिका सोफिया शेख व चार विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

शाळेने सलग दुसऱ्या वर्षीही स्वच्छता मॉनिटर या प्रकल्पात रायगड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हॉईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत आदींनी शाळेचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबई मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांना ३० हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

१० नोव्हेंबरपासून दिवाळी सण सुरू होत असून नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांची दिवाळी आनंदात जावी यादृष्टीने २०२२-२३ या वर्षाकरिता महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांना रू. ३० हजार तसेच करार/तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचाऱ्यांना रू. २४ हजार आणि आशा वर्कर यांना रू.१४ हजार रक्कमेचे सानुग्रह अनुदान जाहीर केलेले आहे.

यामध्ये महापालिका आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी. प्राथमिक व माध्यमिक शिक्षक तसेच राज्य शासनाकडील बदलीने, प्रतिनियुक्तीने वा प्रशिक्षणार्थी असलेले अधिकारी-कर्मचाऱ्यांना रू. ३० हजार सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे ठोक मानधनावर, किमान वेतनावरील तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीवरील वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असणारे अधिकारी-कर्मचारी, रोजंदारीवरील आरोग्य सेवक, मानधनावरील बालवाडी शिक्षक व मदतनीस यांना रू. २४ हजार इतकी सानुग्रह अनुदान रक्कम प्रदान केली जाणार आहे.

याशिवाय सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शासनाने कंत्राटी तत्वावर नेमलेले व शासनाकडून मानधन प्राप्त होणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही करार पद्धतीवरील कर्मचाऱ्यांप्रमाणे रू. २४ हजार इतके सानुग्रह अनुदान त्याचप्रमाणे आरोग्य विभागातील आशावर्कर यांना रू.१४ हजार सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. अशाप्रकारे एकूण ४५५९ अधिकारी, कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यास महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी मान्यता दिली आहे.

दिवाळी सणापूर्वीच ही रक्कम अधिकारी, कर्मचारी यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे आदेश सर्व विभागांना देण्यात आलेले असून त्यामुळे महापालिका अधिकारी, कर्मचारी यांची दिवाळी आनंदात जाणार आहे.

दिवाळी सणाच्या अनुषंगाने महापालिका अधिकारी, कर्मचारी यांना मागील वर्षीपेक्षा वाढीव सानुग्रह अनुदान वितरण करण्याच्या महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी घेतलेल्या कर्मचारीहिताय निर्णयाचे महापालिका अधिकारी, कर्मचारीवृंदाकडून स्वागत करण्यात आले आहे.

# नवी मुंबई महापालिकेतर्फे दक्षता जनजागृती सप्ताह उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय दक्षता आयोगाच्या परिपत्रकानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई यांच्यामार्फत सूचित करण्यात आल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रत्येक वर्षी थोर स्वातंत्र्यसेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करुन भ्रष्टाचार निर्मुलनाविषयी जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यात येते. या वर्षीच्या सप्ताहाकरिता शासनाने 'भ्रष्टाचाराला नाही म्हणा; राष्ट्रासाठी वचनबध्द व्हा' ही संकल्पना निश्चित करण्यात आली असून हे घोषवाक्य लिहिलेले बॅनर्स नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयासह सर्व कार्यालयांमध्ये तसेच विष्णुदास भावे नाट्यगृहात दर्शनी जागी नागरिकांच्या सहज दृष्टीस पडतील अशाप्रकारे प्रदर्शित करण्यात आले आहेत.

याशिवाय नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांत 'प्रामाणिकपणा व सचोटी यांच्या उच्चतम मानकाप्रती वचनबध्द असायला हवे आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्यासाठी साथ दिली पाहिजे', अशा आशयाची प्रतिज्ञा सामुहिकरित्या घेण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ॲम्फीथिएटर येथे ही प्रतिज्ञा अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये सामुहिकरित्या ग्रहण करण्यात आली.

याशिवाय महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांत दर्शनी भागात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा पत्ता तसेच संपर्क (०२२-२७८३३३४४/८३५५९०१४४७) त्याचप्रमाणे ई-मेल आयडी dyspacbnmgmail.com आणि dyspacbnavimumbaimahapolice.gov.in असलेला फलक अद्ययावत करण्याचे निर्देश विभाग अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत.

# नवी मुंबई विमानतळापासून दोन मेट्रो मार्गिका; नव्याने अभ्यास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम वेगाने पुढे सरकत असताना सिडकोने नवे विमानतळ-बेलापूर ते मानखुर्दपर्यंत नव्या मेट्रो मार्गिकेचा पुन्हा एकदा अभ्यास सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत मेट्रोची स्वतंत्र मार्गिका यापूर्वीच प्रस्तावित असली तरी या प्रकल्पाची नवी मुंबई हद्दीतील आखणी सिडकोने करावी अशी भूमिका महानगर विकास प्राधिकरणाने मांडली आहे. यानंतर सिडकोने या नव्या मार्गिकेची सुसाध्यता तपासण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

मेट्रो मार्गिकांचा विस्तार सिडकोने यापूर्वीच तयार केलेल्या बेलापूर-खारघर-तळोजा-पेंधर मार्गावरील मेट्रो मार्ग पूर्णत्वास आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वेळ मिळताच या प्रकल्पाचे लोकार्पण केले जाणार आहे. या मार्गाचे काम सुरू करीत असतानाच सिडकोने नवी मुंबईत वेगवेगळ्या मेट्रो मार्गिकांची आखणी केली होती. दरम्यान विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आल्याने सिडको आणि एमएमआरडीएने पुन्हा एकदा मेट्रो जोड प्रकल्पाच्या आखणीचा अभ्यास सुरू केला आहे.

# सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त 'जेएसएस'ची एकता दौड उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल न्हावा येथे जेएसएसच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये मंगळवारी (दि. ३१) सरदार वल्लभभाई पटेल जयंतीचे औचित्य साधून प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी सहकार्यातून न्हावा येथे एकता दौडचे आयोजन करण्यात आले.

या वेळी बॅग मेकिंग स्पर्धा, कौशल्य मेकअप स्पर्धा, स्वच्छता उपक्रम व कापडी पिशव्यांचे वाटप उपस्थितांना करण्यात आले तसेच जिल्हाभरात असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रीय एकता कार्यक्रमावेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, वेदांती पाटील, प्रशिक्षिका सुलोचना घरत, सोनिया पाटील, वनिता म्हात्रे, विप्रली पुसाळकर, अरुणा धर्माधिकारी, नेत्रा पानवलकर व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.



# कळंबोलीत बच्चेकंपनींची किल्ल्यासाठी लगबग

**कळंबोली : बातमीदार**

कॉंक्रीटच्या जंगलातही दिवाळीमधील किल्ल्यांची लगबग आता जोर धरू लागली आहे. मोबाईलवर फिरकणाऱ्या बोटांनी कळंबोलीतील हाऊसिंग सोसायटीमधील बच्चे कंपनी मिळेल त्या साधनाने मुरूड जंजिरामधील किल्ल्याची प्रतिकृती साकारित आहेत.

कळंबोलीतील गुरुविला सोसायटीमधील हे शालेय विद्यार्थी दरवर्षी विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती साकार करतात.

वसाहतीमध्ये विविध संघटनांकडून घेण्यात येणाऱ्या किल्ला स्पर्धांमध्ये मुले सहभागी होतात अन् बक्षीसही मिळवतात. २१व्या शतकामध्ये मोबाईलवर चालणाऱ्या हातांनी शिवरायांचे किल्लेही मुले साकारत असल्याने त्यांचा आदर्श बाकीचे भावी पिढी ही घेत आहे. वसाहतमधून माती मिळणे दुरापास्त असते.

मग दगड, फेवर तुटलेल्या टाइल्स, कडापे व अन्य साहित्यांनी ही मुले आपले कलाकृती जपून किल्ल्याच्या प्रतिकृती तयार करीत आहेत. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

या मुलांना प्रोत्साहन देणारे ही तितकेच आहेत. त्यामुळे सोसायट्यांमधून वावरणारी मुले किल्ल्यांच्या प्रतिकृती साकरीत असल्याचे चित्र कळंबोली पहावयास मिळत आहे.




# नेरूळ स्टेशन परिसरात विनापरवाना मद्यविक्री

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ स्टेशन परिसरात एका फेरीवाल्याला मंगळवारी (दि. ३१) पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून साडेसात हजारांची विनापवरवाना दारू जप्त केली.

मंगळवारी पोलीस रात्री १२ वा. च्या सुमारास गस्त करीत असताना सेक्टर २० नेरुळ रेल्वे स्टेशन परिसरात सिद्धीलिगअप्पा नावाची व्यक्ती विनापरवाना दारू विक्री करीत असल्याची माहिती मिळाली.

पोलीस व पंच यांनी धाड टाकत एकास जागीच ताब्यात घेतले व त्याच्याकडील मद्याच्या ६२ बाटल्या जप्त केल्या आहेत.

# प्रेमसंबंधातून लेडीज बारमध्ये गोळीबार; गुन्हा दाखल

## कोन येथील घटना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बारबालेसोबतच्या प्रेमसंबंधातून एका तरुणाने स्वतःवर गोळी झाडल्याची घटना शनिवारी (दि. २८) घडली. या घटनेतील जखमी तरुणाची प्रकृती सध्या स्थिर आहे. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि. ३१) दुपारी गुन्हा दाखल करण्यात आला. रुग्णालयातून पोलीस ठाण्यात अहवाल आल्यानंतर पोलिसांना याबाबत माहिती मिळाली.

तालुक्यातील कोन गावालगत क्रेझी बॉईज बार आहे. या बारमध्ये खोणी (बदलापूर) येथे राहणारे निलेश घरत त्यांच्या प्रियसीसाठी आला होता. पोलीस ठाण्यात या बारबालेने दिलेल्या तक्रारीनुसार, मागील अडीच वर्षांपासून निलेश व या बारबालेचे प्रेमसंबंध आहेत. काही कारणास्तव तिने निलेशसोबत बोलणे बंद केले होते. तिने संपर्क ठेवला नसल्याने निलेशने तिला गाठण्याचे ठरवले. या बारमध्ये निलेश शनिवारी रात्री १.१५ वाजता भेटला. तिला का बोलत नाही असा जाब विचारला मात्र तरीही बोलण्यास नकार दिल्याने निलेशने स्वतःसोबत आणलेल्या पिस्तुलमधून स्वतःच्या पोटात गोळी झाडली. सध्या निलेशवर उपचार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगीतले.

निलेशने स्वतःसोबत आणलेले पिस्तुल हे अवैध होते. ते विनापरवाना असल्याने तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांनी भा.दं.वि. कलम ३३८, ३२३ प्रमाणे तसेच भारतीय हत्यार कायद कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) १३५ प्रमाणे गुन्हा नोंदविला.

# खारघरमध्ये ई-चलनद्वारे ९८ दुचाकींना दंड



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रेल्वेस्थानकातून बाहेर पडल्यावर प्रवाशांना रिक्षा स्थानकावर जाता यावे, यासाठी सिडकोने प्रवेश मार्गालगत आणि तिकीट खिडकीच्या समोरील भागात रिक्षाचालकांसाठी वाहनतळ उभारले आहे, पण राखीव असलेल्या जागेतच दुचाकी उभ्या केल्या जात असल्याने खारघर वाहतूक पोलिसांनी ९८ वाहनांवर ई-चलनद्वारे दंडात्मक कारवाई केली आहे.

खारघर स्थानकात दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी रेल्वे स्थानकावरील छतावर आणि स्थानकांच्या समोरील बाजूला वाहनतळ उभारले आहे तरीदेखील दुचाकीचालक रिक्षाचालकांसाठी राखीव असलेल्या वाहनतळाच्या जागेत वाहने उभी करत होते. या प्रकारामुळे स्थानकांतून बाहेर पडणारे प्रवासी तसेच रिक्षाचालकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. याबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या गेल्या होत्या. त्यामुळे खारघर वाहतूक शाखेच्या पथकाने ९८ दुचाकीवाहनांवर ई-चलानद्वारे दंडात्मक कारवाई केली आहे.

# रियान परागने रचला इतिहास

## टी-२० क्रिकेटमध्ये सलग सात अर्धशतकांचा विश्वविक्रम

**मोहाली : वृत्तसंस्था**

रियान परागने मंगळवारी रात्री पश्चिम बंगालविरुद्धच्या सामन्यात वीरेंद्र सेहवाग, जोस बटलर, कामरान अकमल आणि हॅमिल्टन मसाकादझा यांसारख्या दिग्गजांचे रेकॉर्ड मोडले. टी-२० क्रिकेटमध्ये सलग सात सामन्यांत सात अर्धशतके झळकावणारा रियान पराग हा जगातील पहिला फलंदाज ठरला आहे.




आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणारा आसामचा युवा क्रिकेटर रायन पराग सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेत त्याने अप्रतिम कामगिरी केली आहे. या स्पर्धेत आसाम संघाचे नेतृत्व करताना परागने अप्रतिम कामगिरी करीत आपल्या संघाला उपांत्यपूर्व फेरीत पोहचवले. मागील सामन्यातच रियान परागने सलग सहा अर्धशतके झळकावून विक्रम केला होता. आता त्याने सलग सातव्या सामन्यात अर्धशतक झळकावले आहे. या स्पर्धेत त्याने ११ विकेट्सही घेतल्या आहेत. गेल्या काही महिन्यांत त्याने अष्टपैलू म्हणून स्वत:ला सिद्ध केले असून टीम इंडियाचे दरवाजेही ठोठावले आहेत.

रियान परागने या स्पर्धेतील आठव्या सामन्यात सातवे अर्धशतक ठोकले आहे. पहिल्या सामन्यात त्याला ४५ धावाच करता आल्या होत्या. त्यानंतर प्रत्येक सामन्यात त्याने अर्धशतक झळकावले आहे. रियानच्या नेतृत्वाखाली आसामने मंगळवारी पश्चिम बंगालविरुद्ध शानदार विजय मिळवला. त्याच्या अप्रतिम फलंदाजीच्या जोरावर आसामने बंगालचा आठ गडी राखून पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. या सामन्यात ५० धावांच्या नाबाद खेळीसोबतच रियानने चार षटकांत २३ धावा देत दोन विकेट्सही घेतल्या.

रियान परागव्यतिरिक्त जगातील कोणालाही टी-२० क्रिकेटमध्ये सलग सहा अर्धशतके झळकावता आलेली नाहीत. त्याने सात अर्धशतके झळकावत विश्वविक्रम केला आहे. रियान परागच्या आधी हा विक्रम वीरेंद्र सेहवाग, इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलर, पाकिस्तानचा माजी यष्टीरक्षक कामरान अकमल आणि झिम्बाब्वेचा माजी कर्णधार आणि सलामीवीर हॅमिल्टन मसाकादझा यांसारख्या दिग्गजांच्या नावावर होता.

### अष्टपैलू प्रदर्शन

रियान परागने या स्पर्धेतील आठ सामन्यांमध्ये बॉल आणि बॅट दोन्हीसह आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. फलंदाजीच्या जोरावर त्याने आठ डावांत सात अर्धशतकांसह ४९० धावा केल्या. त्याचबरोबर गोलंदाजीतही शानदार प्रदर्शन करताना ११ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने टीम इंडियाचे दरवाजे ठोठावण्यास सुरुवात केल्याचे मानले जात आहे.

# इंग्लंडचा डेव्हिड विली निवृत्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गतविजेत्या इंग्लंडच्या संघाला यंदाच्या वनडे विश्वचषकमध्ये खास कामगिरी करता आली नाही. क्रमवारीत तळाशी असलेल्या इंग्लिश संघावर स्पर्धेबाहेर होण्याची नामुष्की ओढावली आहे. अशातच संघाचा वेगवान गोलंदाज डेव्हिड विलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. सध्या सुरू असलेल्या विश्वचषकानंतर तो निवृत्त होणार आहे.




विलीने सोशल मीडियावर एक भलीमोठी पोस्ट करीत निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त असल्याचे सांगताना विलीने पोस्टच्या माध्यमातून म्हटले की, हा दिवस यावा असे मला कधीच वाटत नव्हते. माझी पहिल्यापासूनच इंग्लंडसाठी क्रिकेट खेळायची इच्छा होती. इथपर्यंतचा प्रवास खूप चांगला आणि संस्मरणीय राहिला, पण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याची हीच चांगली वेळ असल्याचे मला वाटते. मी एवढ्या चांगल्या संघाचा भाग राहिलो याचा अभिमान आहे. इंग्लिश संघासोबत माझ्या खूप आठवणी आहेत, ज्यांनी मला कठीण काळात साथ दिली. माझे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी तडजोड करणाऱ्या सर्वांचे आभार... माझी पत्नी, मुले, आई आणि वडिलांचा मी ऋणी आहे. सर्वांचे आभार...!



# कॅमेरामन बनलेल्या ‘सूर्या’ने घेतली मरीन ड्राईव्हवर चाहत्यांची मुलाखत

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ वनडे विश्वचषकात चमकदार कामगिरी करत आहे. यंदाच्या पर्वातील ३३वा सामना भारत आणि श्रीलंका यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. ‘रोहितसेने’ने आतापर्यंत सर्व सामने जिंकून विजयी ‘षटकार’ मारण्यात यश मिळवले असून क्रमवारीत अव्वल स्थान गाठले आहे. सलग सातवा विजय मिळवण्याच्या इराद्याने टीम इंडिया गुरुवारी मैदानात उतरेल. आपल्या घरच्या मैदानावर विश्वचषक खेळायला आलेल्या सूर्यकुमार यादवने मरीन ड्राईव्हवर जाऊन अनोळखी म्हणून लोकांशी संवाद साधला.

बीसीसीआयने सूर्यकुमार यादवचा एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तो मरीन ड्राईव्हवर लोकांशी संवाद साधताना दिसत आहे. ‘सूर्या’ने मुलाखतीदरम्यान लोकांना विश्वचषक आणि टीम इंडियाबद्दल काही प्रश्न विचारले. लक्षणीय बाब म्हणजे मास्क परिधान केलेल्या सूर्याला कोणीच ओळखू शकले नाही. त्याने चेहऱ्यावर मास्क, डोक्यात टोपी आणि चष्मा लावला होता. त्यामुळे अनोळखी सूर्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. अखेर त्याने एका चाहत्याला परिचय दिला मग उपस्थित चाहत्यांना भारतीय खेळाडूसोबत फोटो काढण्याचा मोह आवरला नाही.

दरम्यान, चालू विश्वचषकात सूर्यकुमार यादवला आतापर्यंत दोन सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात तो दोन धावांवर असताना धावबाद झाला, पण इंग्लंडविरुद्ध संघ अडचणीत असताना त्याने ४९ धावांची महत्त्वाची खेळी केली. त्यामुळे श्रीलंकेविरूद्धच्या सामन्यातदेखील त्याला संधी मिळण्याची शक्यता आहे.

### जडेजाही झाला अवाक्!

मरीन ड्राईव्हवर जाण्यापूर्वी सूर्यकुमार यादवचा अवतार पाहून रवींद्र जडेजा अवाक् झाला. तोदेखील भारताच्या मिस्टर ३६०ला ओळखू शकला नाही. यानंतर सूर्याचा आत्मविश्वास वाढला अन् त्याने लोकांशी मनमोकळ्यापणाने संवाद साधला.

# वर्ल्डकपमध्ये श्रीलंकेचा मार्ग खडतर

## अफगाणिस्तानच्या विजयानंतर समीकरण बदलले

**पुणे : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेत अफगाणिस्तानने श्रीलंकेला सात गडी राखून धूळ चारत ऐतिहासिक विजय मिळवला. अफगाणी संघाच्या विजयाने श्रीलंकेच्या उपांत्य फेरीत पोहचण्याचा मार्ग खडतर झाला आहे. पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २४१ धावा केल्यानंतर अफगाणिस्तानने तीन गडी गमावून लक्ष्य गाठले. या पराभवामुळे श्रीलंकेचा पुढचा मार्ग कठीण झाला आहे.



यंदाच्या विश्वचषकातील अफगाणिस्तान संघाचा हा तिसरा विजय आहे. याआधी त्यांनी इंग्लंड आणि पाकिस्तानला मात दिली होती. अफगाणिस्तानच्या अप्रतिम फिरकी गोलंदाजीने श्रीलंकेला अवघ्या २४१ धावांत रोखले आणि रहमत शाहने तुफानी अर्धशतकी खेळी करीत संघाला विजय मिळवून दिला. अफगाणिस्तानने श्रीलंकेचा सात गडी राखून पराभव केला. फजलहक फारुकीला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ४९.३ षटकांत २४१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानने ४५.२ षटकांत २४२ धावा करत सामना जिंकला. श्रीलंकेसाठी कोणत्याही फलंदाजाने मोठी खेळी खेळली नाही, परंतु सर्वांच्या तुरळक योगदानामुळे संघाने २०० धावांचा टप्पा पार केला. पाथुम निसांकाने सर्वाधिक ४६ धावा केल्या. कुसल मेंडिसने ३९ आणि सदिरा समरविक्रमाने ३६ धावांचे योगदान दिले. शेवटी तिक्षणा २९ धावा केल्या. अफगाणिस्तानकडून फजलहक फारुकीने चार विकेट्स घेतल्या. मुजीब उर रहमानने दोन गडी बाद केले. अजमतुल्ला आणि राशिद खान यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा लांबणीवर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने परभणी मानवत येथे ५ नोव्हेंबरपासून होणारी किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा मराठा आंदोलनामुळे पुढे ढकलण्यात आली आहे.

मराठा आंदोलन दिवसेंदिवस अधिक अधिक उग्र स्वरूप घेत आहे. एकूणच मराठा आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन परिस्थिती पूर्वपदावर आल्याची खातरजमा करून लवकरच पुढील तारखा जाहीर करण्यात येतील. सर्व संघटना, खेळाडू, सामणाधिकारी व कार्यकर्ते यांना झालेल्या तसदीबद्दल महाराष्ट्र राज्य संघटनेकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. तशा प्रकारचे परिपत्रक महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी प्रसारमाध्यमांद्वारे जारी केले आहे.

# सकारात्मक गोष्टींनी शक्य तितका आनंद घेण्याचा प्रयत्न -जसप्रीत बुमराह

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने आशिया चषक स्पर्धेच्या आधी आयर्लंड दौऱ्यावर पुनरागमन केले आणि तेव्हापासून त्याची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कामगिरी बहरत आहे. मैदानात परतल्यापासून बुमराहने मागे वळून पाहिलेच नाही. तो आणखी घातक गोलंदाज झाला आहे. संघात पुनरागमन केल्याबद्दल त्याने समाधान व्यक्त केले आहे.

आशिया चषक स्पर्धेच्या आधीचे १२ महिने जसप्रीत बुमराहसाठी खूप कठीण होते. आशिया चषकादरम्यान त्याला दुखापत झाली आणि एक वर्ष तो क्रिकेटपासून दूर होता. या कालावधीत तो टी-२० विश्वचषक खेळला नाही किंवा २०२३च्या आयपीएलमध्येही भाग घेतला नाही. त्याची अनुपस्थिती टीम इंडियाला स्पष्टपणे जाणवली.

बुमराहने पुनरागमनाच्या तीन महिन्यांत आत्मविश्वास परत मिळवला आहे. तो सतत १४०+ च्या वेगाने चेंडू टाकत आहे. आता तो नेहमीपेक्षा जास्त भेदक गोलंदाजी करत आहे. पुनरागमनानंतर बुमराहने एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या १३ डावांमध्ये २६ विकेट्स घेतल्या आहेत. त्याच्या अनुपस्थितीत क्रिकेट चाहत्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले



होते, मात्र मैदानाबाहेर असताना बुमराहने एनसीएमध्ये खूप मेहनत घेतली.

स्टार स्पोर्ट्सशी बोलताना बुमराह म्हणाला, माझी पत्नी स्पोर्ट्स प्रेझेंटर संजना गणेशनदेखील स्पोर्ट्स मीडिया विभागात काम करते. माझ्या कारकिर्दीवर बरेच प्रश्न उपस्थिती झालेले मी ऐकले आहेत. मी कधीही परत येणार नाही किंवा पुनरागमन करू शकणार नाही, असे लोक बोलत होते, मात्र या सर्व गोष्टींचा माझ्यावर काही फरक पडला नाही. मी या क्षणी खूप आनंदी असून संघात परत आलो आहे. मला क्रिकेट खेळायला किती आवडते याची जाणीव सर्वांना झाली. मी कोणत्याही विक्रमाचा पाठलाग करीत नव्हतो. दुखापतीतून पुनरागमन करताना माझ्याकडे खूप वेळ व आजूबाजूला चांगले वातावरण होते. मी सकारात्मक गोष्टींकडे पाहत असून शक्य तितका त्याचा आनंद घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

# सचिन तेंडुलकरच्या पुतळ्याचे अनावरण



**मुंबई** : येथील वानखेडे स्टेडियममध्ये उभारण्यात आलेल्या जगविख्यात क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर याच्या भव्य पुतळ्याचे अनावरण बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यास ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे, बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला, सचिव जय शाह, खजिनदार आमदार ॲड. आशिष शेलार, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे, सचिव अजिंक्य नाईक, सहसचिव दीपक पाटील, अन्य पदाधिकारी, सदस्य, सचिनचे कुटुंबिय उपस्थित होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com